मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४४ ■ रविवार, ०१ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## () थोडक्यात ()

### मुंबईत अवघ्या ४०० मीटर अंतरासाठी अमेरिकन महिलेकडून उकळले १८ हजार रुपये; टॅक्सी चालकाला अटक

**मुंबई :** बाहेरील राज्यातून आलेल्या पर्यटकांची स्थानिक रिक्षा किंवा टॅक्सी चालक फसवणूक करून त्यांच्याकडून जादा पैसे आकारतात. मुंबई बाहेरील शहरांमध्ये असे प्रसंग घडल्याचे आपल्याला ऐकिवात असेल. पण मुंबईतही असेच एक धक्कादायक प्रकरण घडले आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अवघ्या ४०० मीटर अंतरावर असलेल्या हॉटेलमध्ये जाण्यासाठी एका अमेरिकन महिलेला टॅक्सी चालकाने तब्बल १८,००० रुपये आकारले. यानंतर आता या टॅक्सीचालकाला अटक करण्यात आली आहे. अमेरिकन महिलेने सोशल मीडियावर याबाबत कैफियत मांडल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

### जळगाव महापौरपदाची निवड ६ फेब्रुवारीला; नावे अद्याप निश्चित नाहीत

**जळगाव :** नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीनंतर आता जळगाव महापौर व उपमहापौर निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या निर्देशानुसार ६ फेब्रुवारी रोजी महापौर व उपमहापौरांची निवड होणार आहे. मात्र उमेदवारांची नावे अद्याप अधिकृतपणे निश्चित झालेली नाहीत.जळगाव महापालिकेत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले असून, त्यानुसार भाजपचा महापौर आणि शिवसेना (शिंदे गट) चा उपमहापौर निवडला जाण्याची शक्यता आहे. अर्ज उचलण्याच्या अखेरच्या दिवशी भाजपकडून महापौरपदासाठी सहा आणि उपमहापौरपदासाठी सहा असे एकूण बारा अर्ज उचलण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

### रीलच्या नादात गमावला जीव; उड्डाणपुलाजवळ स्लॅब कोसळून २२ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू



**नवी दिल्ली :** सोशल मीडियासाठी रील बनवण्याचा उत्साह एका तरुणाच्या आयुष्यावर बेतल्याची धक्कादायक घटना उत्तर प्रदेशातील बरेली येथे घडली आहे. उड्डाणपुलाच्या सुरू असलेल्या बांधकामाजवळ रील शूट करताना स्लॅब डोक्यावर कोसळल्याने २२ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला.

# मी, सुनेत्रा अजित पवार...',

## सुनेत्रा पवारांनी घेतली शपथ, महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी) :** राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांनी काल (३१ जानेवारी) शपथ घेतली. राज्याचे प्रभारी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे काही प्रमुख नेते उपस्थित होते.



**महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रीपदाची निवड करण्यात आली. त्यामुळं महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होण्याचा मान हा सुनेत्रा पवार यांना मिळाला आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्रिपदाच्या शपथविधी सोहळ्यापूर्वी विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीला पक्षाचे सर्व आमदार व प्रमुख नेते उपस्थित होते. या बैठकीमध्ये सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली. यानंतर सायंकाळी ५ वाजता त्यांचा शपथविधी पार पडला.

**एकमतानं राष्ट्रवादीच्या विधिमंडळ गटनेतेपदी निवड :** विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटनेतेपदासाठी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव ज्येष्ठ नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी मांडला, तर दिलीप वळसे-पाटील यांनी त्यास अनुमोदन दिलं. त्यानंतर सुनेत्रा पवार यांची एकमतानं राष्ट्रवादीच्या विधिमंडळ गटनेतेपदी निवड करण्यात आली. या निवडीची अधिकृत माहिती विधिमंडळ सचिवांना कळवण्यात आली. तसंच गटनेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांनी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा देखील राजीनामा दिला.

# साध्वी प्रेम बाईसा यांचा संशयास्पद मृत्यू

## उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) :** राजस्थानमधील प्रसिद्ध साध्वी प्रेम बाईसा यांचा बुधवारी संशयास्पद मृत्यू झाला. जोधपूरमधील पाल गाव येथील आश्रमात त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर पोलिसांनी आश्रम सील केला असून मृतदेह महात्मा गांधी रुग्णालयाच्या शवगृहात ठेवण्यात आला आहे.



**व्हिडीओमुळे तर्कवितर्क**

बुधवारी सकाळी साध्वी प्रेम बाईसा यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला होता. त्यानंतर आश्रमातच डॉक्टरांना बोलावून त्यांना इंजेक्शन देण्यात आले. इंजेक्शननंतर त्यांना थोडा वेळ आराम मिळाला, मात्र एका तासानंतर त्यांची प्रकृती पुन्हा खालावल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. गेल्या वर्षी सोशल मीडियावरील एका वादामुळे त्या चर्चेत आल्या होत्या. त्यानंतर त्या अध्यात्मिक कार्यात सक्रिय होत्या. मंगळवारीच त्या अजमेर येथे नऊ दिवसांची भागवत कथा पूर्ण करून आश्रमात परतल्या होत्या.

# प्रदूषणामुळे पनवेलमधील ३४ प्रकल्पांच्या बांधकामांना महापालिकेकडून स्थगिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पनवेल महानगरपालिका प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहेत. वायू व ध्वनी प्रदूषणावर नियंत्रणाचे नियम न पाळणा-या ३४ प्रकल्पांचे बांधकामांना अखेर महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानंतर स्थगिती देण्यात आली आहे. पनवेल महानगरपालिका हद्दीतील बांधकाम प्रकल्पांवर वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण व पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाबाबत व्यापक तपासणी करून ही कारवाई करण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या जनसंपर्क विभागाने शनिवारी दिली. स्थळपाहणी अहवालानुसार ३४ बांधकामस्थळांवर कठोर कारवाई करण्यात आली असून सदर प्रकल्पांचे काम तात्काळ थांबविण्यात आल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

मागील महिन्यात महापालिकेच्या प्रभाग स्तरीय पर्यावरण समिती आणि नगररचना विभागाने महापालिका क्षेत्रातील १६९ बांधकाम प्रकल्पांना / स्थळांना उपाययोजना करणेबाबत अथवा काम बंद करणेबाबत इशारावजा जाहीर नोटीस दिली होती. संबंधित बांधकाम व्यावसायिकांना नोटीसा बजावण्यात आल्यानंतरही काही व्यवसायिकांनी अपेक्षित



कार्यवाही न केल्याचे दिसून आले.

त्यानंतर महानगरपालिकेच्या पथकाने पुन्हा एकदा प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी केल्यानंतर या तपासणीमध्ये अनेक ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना न करणे, बांधकाम साहित्य खुले ठेवणे, बांधकामाच्या ठिकाणी प्रदूषण करणाऱ्या साहित्यावर नियमाप्रमाणे पाणी न शिंपडणे, वाहन स्वच्छता न करणे, तसेच ब्लास्टिंग करतानाच्या मानक कार्यपद्धतीचे पालन न करणे आदी गंभीर बाबी निदर्शनास आल्या.त्यानंतर आयुक्त चितळे यांनी नियम न पाळणा-यांना बांधकाम व्यावसायिकांना पर्यावरणाचे महत्व समजण्यासाठी कळंबोली विभागातील १० बांधकाम प्रकल्प, कामोठे विभागातील ९ बांधकाम प्रकल्प आणि नवीन पनवेल तसेच पनवेल शहर विभागातील १५ बांधकाम प्रकल्पांचे काम थांबविण्याची कारवाई केली.


# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'लोकनेते दि. बा. पाटील' यांचे नाव देण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक; लोकसभेत अधिकृत माहिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाबाबत पनवेल, उरण, नवी मुंबई आणि रायगडमधील तमाम भूमिपुत्रांच्या अस्मितेचा विजय झाला आहे. या विमानतळाला 'लोकनेते दि. बा. पाटील' यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावावर केंद्र सरकार सकारात्मक असून, या संदर्भातील अधिकृत माहिती नुकतीच संसदेत (लोकसभा) देण्यात आली आहे.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण 'लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे करण्याबाबतचा अधिकृत प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडून प्राप्त झाला असल्याचे नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने लोकसभेत स्पष्ट केले असून प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी अनेकदा तीव्र आंदोलन आणि पाठपुरावा केल्यानंतर ही एक महत्त्वाची घडामोड झाली आहे.

**संसदेतील उत्तरातील महत्त्वाचे मुद्दे:**

प्रस्तावाचा स्वीकार: महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने एकमताने मंजूर केलेला ठराव केंद्र सरकारला (नागरी विमान वाहतूक मंत्रालय)



अधिकृतपणे प्राप्त झाला असल्याची पुष्टी करण्यात आली आहे.केंद्राची सकारात्मकता: केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की, राज्याने पाठवलेल्या 'लोकनेते दि. बा. पाटील' या नावाच्या प्रस्तावावर केंद्र सरकार सकारात्मक असून, त्यावर पुढील प्रशासकीय प्रक्रिया सुरू आहे.प्रक्रिया अंतिम टप्प्यात: विमानतळाचे अधिकृत नामकरण ही एक निश्चित प्रशासकीय प्रक्रिया आहे. राज्य सरकारच्या प्रस्तावानंतर केंद्र सरकार आता यावर अंतिम तांत्रिक मोहोर उमटवण्याच्या तयारीत आहे.

**मंत्रिमंडळाची २०२२ मध्ये नावाच्या प्रस्तावाला मंजुरी**

नवी मुंबईच्या शेतकऱ्यांना, त्यांच्या जमिनीला योग्य मोबदला मिळावा यासाठी दि. बा. पाटील यांनी मोठा लढा दिला होता. या जमिनी महाराष्ट्राच्या सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडून नियोजित नव्या शहराच्या उभारणीसाठी संपादित करण्यात आल्या होत्या. महाराष्ट्र मंत्रिमंडळाने २०२२ मध्ये शिंदे-फडणवीस यांच्या भाजप शिवसेना सरकारने या विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली होती.

**आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रतिक्रिया:**

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव या विमानतळाला मिळावे, हा केवळ आमचा आग्रह नसून तो प्रत्येक भूमिपुत्राचा हक्क आहे. केंद्र सरकारने संसदेत दिलेली ही माहिती आपल्या लढ्याला मिळालेली महत्वाची पावती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार स्थानिक जनतेच्या भावनांची कदर करत असून, लवकरच यावर अधिकृत शिक्कामोर्तब होईल, असा आम्हाला विश्वास आहे. सध्या सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारचा हा सकारात्मक पवित्रा महायुती आणि भाजपसाठी अत्यंत आश्वासक मानला जात आहे.

# अर्थसंकल्पाकडून अमरावतीला औद्योगिक, कृषी आणि पर्यटन विकासाची अपेक्षा

**दैनिक युवक आधार**

**नागपूर (प्रतिनिधी) :** केंद्र सरकारचा अर्थसंकल्प रविवारी (१ फेब्रुवारी) सादर होत असून त्यानंतर महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर विदर्भातील महत्वाचं शहर आणि जिल्हा असणाऱ्या अमरावतीच्या औद्योगिक, कृषी, पर्यटन आणि मेळघाटातील आदिवासी विकासाबाबत अर्थसंकल्पाकडून मोठ्या अपेक्षा आहेत. जिल्ह्याला या अर्थसंकल्पातून नेमकं काय अपेक्षित आहे? याबाबत अमरावती एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर यांनी 'ईटीव्ही भारत'शी बोलताना आपलं मत व्यक्त केलंय.

**अमरावतीत औद्योगिक विकासला गती देण्याची गरज :** "अमरावती जिल्हा



आजही औद्योगिक दृष्ट्या मागास असून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित आहेत. केंद्र सरकारनं जाहीर केलेला मेगा टेक्स्टाईल पार्क आणि राज्य सरकारच्या टेक्स्टाईल पार्कचं काम प्रत्यक्षात वेगानं होणं गरजेचं आहे. फार्म टू फॅशन अर्थात कच्च्या कापसापासून तयार वस्त्रापर्यंत बॅकवर्ड आणि फॉरवर्ड इंटिग्रेशन अमरावतीत उभं राहावं यासाठी ठोस धोरणांची आवश्यकता आहे," असं किरण पातुरकर यांनी सांगितलं.

**वीजदर कमी करण्याची मागणी :** "लघुउद्योगांसमोर सर्वात मोठी अडचण म्हणजे महागडी वीज होय. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी आणि निर्यात क्षम उद्योग उभारण्यासाठी विजेचे दर कमी होणं अत्यावश्यक आहे. अन्यथा लघुउद्योगांना काम करणं कठीण होईल," अशी स्पष्ट भूमिका किरण पातुरकर यांनी मांडली.

**छोट्या उद्योगांसाठी हवं रेड कार्पेट धोरण :** "मोठ्या उद्योगांच्या तुलनेत लघु आणि मध्यम उद्योगांसाठी आजही अनेक नियम, परवाने, आणि अटींचं ओझं आहे. हे नियम सुलभ झाले तर अधिकाधिक उद्योजक पुढं येतील. सरकारपेक्षा खासगी क्षेत्र आणि स्वयंरोजगार हे रोजगाराची अधिक संधी निर्माण करतात. यामुळं लघु उद्योगांना प्रोत्साहन देणारं धोरण आवश्यक आहे," असं मत किरण पातुरकर यांनी व्यक्त केलं.

**कापूस, संत्री आणि सोयाबीन आधारित उद्योगांना संधी :** "अमरावती जिल्ह्याची प्रमुख पिकं कापूस, संत्री आणि सोयाबीन ही आहेत. या पिकांवर आधारित उद्योगाचा विकास होणं गरजेचं आहे. जिल्ह्यात संत्रा प्रक्रिया उद्योग आणि सोयाबीनवर आधारित उद्योगांना चालना देण्याची गरज आहे.

# प्रशासकीय विभागांनी सुरक्षिततेची सर्वतोपरी दक्षता घ्यावी – विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम

**दैनिक युवक आधार**

**नाशिक (प्रतिनिधी) :** मालसाणे, ता. चांदवड येथे होणाऱ्या णमोकार महोत्सवासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी सुरक्षिततेची सर्वतोपरी दक्षता बाळगावी, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी आज सकाळी णमोकार तीर्थ येथे भेट देत पाहणी केली. त्यानंतर त्यांनी आढावा बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश ठाकूर, उपविभागीय अधिकारी कैलास कडलग, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळू पाटील, चांदवडचे माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले, की णमोकार महोत्सवासाठी मोठ्या संख्येने भाविक येतील. त्यांच्यासाठी शासनस्तरावरून आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून



दिल्या आहेत. महोत्सव सुरू होण्यापूर्वी त्यांची चाचणी करून घ्यावी. महोत्सव परिसरात नियमितपणे स्वच्छता राहील याची दक्षता घ्यावी. घनकचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी. अग्नी प्रतिबंधक उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असेही आयुक्त डॉ. गेडाम यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी णमोकार तीर्थ येथे जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. तत्पूर्वी विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी हेलिपॅड, वाहनतळ, मुख्य मंडप, पाणीपुरवठा व स्वच्छता आदी कामांची पाहणी करून आढावा घेतला.

यावेळी णमोकार तीर्थ समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# उरणमध्ये जी.पं.व पंसमितीच्या निवडणुका लढण्यासाठी (शिंदेगट) शिवसेना सज्ज

## कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांची भूमिका चुकीची : अतुल भगत

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील** : 9 जानेवारी 2026 रोजी खालापूर ताकई येथे झालेल्या भाजप नेत्यांच्या बैठकीत(शिंदे गट) शिवसेने बरोबर आमचे लग्न लागले नाही ! उरणमध्ये त्यांच्याकडे काळे कुत्रेही नाही, शिवसेना (शिंदे गट) आपल्यावर मेहरबानी करीत नसून केवळ हिंदुत्वाच्या मुद्यावर एकत्रित काम करीत असल्याचे संकेत देत त्यांनी समोर समोर चर्चा करावी असे प्रतिपादन भाजपचे सरचिटणीस दीपक बेहरेयांनी केल्या नंतर खऱ्याअर्थाने उरणच्या शिव सेनेत (शिंदे गट) तीव्रसंताप निर्माण झाला असल्याने, शिवसेना (शिंदे गट) उरणात पूर्ण तात्तीनिशी उभा आहे ही शिंदे गटाच्या शिवसेनेची भूमिका मांडण्या साठी 30 जानेवारी 2026 रोजी (शिंदे गट) शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अतुल भगत यांनी पुन्हा फिनिक्स पक्षा प्रमाणे अवकाशात झेपघेत पत्रकार परिषदेचे



आयोजन केले होते.

यावेळी आपली भूमिका स्पष्ट करताना माजी जिल्हा प्रमुख अतुल भागत म्हणाले ही पत्रकार परिषद भारतीय जनता पार्टीच्या विरोधात नाही. तर ही (शिंदेगट) शिवसेनाची स्थानिक नेतृत्वाबरोबरची लढाई आहे. (शिंदेगट) शिवसेनेच्या पदाधिकाऱ्याचे व कार्यकर्त्यांनी एक मत आहे की देशामध्ये व राज्यांमध्ये आम्ही सर्वजण भारतीय जनता पार्टीच्या सोबत आहोत मात्र. ही आमची (शिंदेगट) शिवसेनेची लढाई स्थानिक नेतृत्वा बरोबर आहे. युती होता होता या निवडणुकीत आम्ही उमेदवार उभे केले. काहींना माघार घेण्याचे आदेश दिले. परंतु निवडणुकी संदर्भात कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांची भूमिका वेगळी आहे. चुकीचे आहे. त्यामुळे पक्षाचे मोठे नुकसान झाले आहे.

ते पुढे म्हणाले नगरपालिकेचे निवडणुक आपल्याला माहित आहे. या निवडणुकीसाठी युती करण्यासाठी आम्ही पदाधिकारी कार्यकर्ते आग्रही होतो. परंतु आमदार महेश बालदी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे आम्ही नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाच्या व नगरसेवकांच्या पदाच्या उमेदवारासाठी उमेदवार उभे केले. त्यानंतर माघार घेण्याच्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व खासदार आप्पा बारणे यांच्याशी आमदार महेश बालदी यांनी संपर्क केला. परंतु त्यांची भूमिका तुम्ही माघार घ्या आणि आम्हाला पाठिंबा द्या. अशी होती, केवळ महेश बालदींच्या आडमुठ्या धोरणामुळे ही युती उरण नगरपरिषदेमध्ये झाली नाही.

त्यानंतर मात्र त्यांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक साठी युती व्हावी. असा कार्यकर्त्यांचा विचार होता. मात्र ही युती न झाल्यामुळे आमच्या (शिंदेगट) शिवसेनेच्या 18 जणांनी उमेदवारी अर्ज भरले. पक्षाकडून एबी फॉर्म भरले. आणि पक्षाकडून माघार घेण्याचे आदेश आले. असे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगून, उमेदवारांवर माघार घेण्यासाठी दबाव आणला. त्यामुळे काही उमेदवारांनी माघार घेतली. तर सहा उमेदवारांनी माघार घेण्यास नकार दिला. पक्षाने आम्हाला ए बी फॉर्म दिलेत. त्यामुळे आम्ही ही निवडणूक लढू .त्यामुळे (शिंदेगट) शिव सेने तर्फे ही निवडणूक लढविली जात आहे. परंतु पक्षाकडून कुठल्याही प्रकारची मदत केली जाणार नाही. साहित्य व सहकार्य केले जाणार नाही. तर कारवाई करू. असे सांगितले गेले .

आमदार महेंद्र थोरवे यांची भूमिका स्पष्ट आहे. महेश बालदिंना मदत करण्यासाठी ही भूमिका आहे. या भूमिकेला आम्ही विरोध करू. उत्तर रायगडचे आमदार महेंद्र थोरवे यांनी दुसऱ्या पक्षाला किंवा मित्राला मदत करण्यासाठी ही भूमिका घेतलेली आहे. हे चुकीचे आहे. त्यानंतर मी प्रचार साहित्य वाटप करून प्रचाराला सुरुवात केली आहे. कार्यकर्त्यांना मदत केली पाहिजे. कार्यकर्ता जगला पाहिजे. त्यांना बळ दिले पाहिजे. उरण पनवेल मध्ये उत्तर रायगडचे आमदार थोरवेंनी निवडणुकीच्या काळात मदत न करता ही अशी भूमिका घेत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांचा तीव्रनिषेध करत आहोत,असेप्रतिपादन (शिंदेगट) शिव सेनेचे माजी जिल्हाप्रमुख अतुल भगत यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले

उरण पनवेल मध्ये भाजपचा उमेदवारांसाठी शिंदे सेनेच्या उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी दिलेले आदेश पक्षातील सहा उमेदवारांनी धुडकावून लावले आहेत.

भाजप शिंदेसेनेत तेढ वाढल्याने महापालिका जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकांच्या आधीच जिल्हाप्रमुखातून अतुल भगत यांना पदावरून दूर केले होते. त्या जागी विनोद साबळे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आल्यानंतर शिंदे सेनेचे 40 पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामा देत संताप व्यक्त केला होता. .भविष्यात उत्तर रायगडचे आमदार महेंद्र थोरवेंनी त्यांनी अशी भूमिका घेऊ नये.असे आमचे मत असून त्यांनी घेतलेल्या या भूमिकेचा उरणातील कार्यकरत्यांच्या मनात तीव्रअसंतोष खदखदत आहे,वादळापुर्वीची ही शांतता असून निवडणुका संपल्यानंतर वरिष्ठांना- पक्षश्रेष्ठींना आम्ही या महेंद्र थोरवे यांच्या नकारात्मक भूमिकेबद्दल सांगणार आहोत. आणि योग्य ती कारवाई करण्यास सांगणार आहोत. असे(शिंदेगट) शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अतुल भगत यांनी शेवटी सांगितले.

---

## गोवा येथे जेष्ठ पत्रकाराचे राष्ट्रीय संमेलन

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील** : संपुर्ण देशातील ज्येष्ठ पत्रकाराचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी केरळ त्रिवेनपुरम येथे स्थापन झालेल्या "जेष्ठ पत्रकार महासंघ भारत" या संघटनेतर्फे दिनांक 14 व15 मार्च रोजी वायसो होटेल बॅगिनी जुना गोवा येथे आयोजित करण्यात येणार आहे.अशी घोषणा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप दीक्षित यांचे आदेशाने राष्ट्रीय सरचिटणीस एन.पी.चेक्कुटी यांनीया संदर्भात प्रसिद्धीकेलेल्या पत्रकात म्हटले आहे.

या दोन दिवसीय संमेलनात जेष्ठ पत्रकाराच्या सामाजिक सुरक्षा परिस्थितीवर चर्चासत्र, व्यवसाय सत्र,गोवा मंत्रालय मंत्री व पत्रकार विभाग सचिवांचे मार्गदर्शन होणार आहे.हे संमेलन गोवा जेष्ठ पत्रकार संघटनेच्या सहयोगाने होत



असून यांची जबाबदारी संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष श्रीमती सुहासिनी प्रभुगावकर,मो.9881099260, गुरुदास सावल, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य मो.9422636018, सुभाष नाईक,राष्ट्रीय परिषद सदस्य मो.9881099255 सांभाळणार आहेत वायसो होटेल जवळील रेल्वे स्टेशन करमाळी आहे. संघटनेच्या राष्ट्रीय सदस्याच्या 2 जणांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय संमेलना बाबत अधिक माहिती व नोंदणी साठी केरळ के.पी.विजयकुमार, राष्ट्रीय खजिनदार मो.9987385484, महाराष्ट्र डॉ.जयपाल पाटील, राष्ट्रीय सचिव मो. 9270446777, तामिळनाडू श्री.आर. रंग राज, मो.984101821, ओडिसा, श्री. कान्हू नंदा मो.7064265525, तेलंगणा आनंदम पुलिपलुपुला,राष्ट्रीय उपाध्यक्ष मो.9949753174, आंध्र प्रदेश डॉ.जनार्दन ,मो.9490108656,मध्य प्रदेश, .चंदर प्रकाश भारद्वाज मो.90390250155, कर्नाटक श्रीमती शांताकुमारी, राष्ट्रीय सचिव मो. 8310240276 ,नवी दिल्ली संदीप दीक्षित राष्ट्रीय अध्यक्ष मो.981831534,केरळ एन.पी.चेक्कुटी राष्ट्रीय सरचिटणीस मो.8301605600/ 9388899300येथे आपली नावे नोंदवावीत.

---

## विक्रोळी कन्नमवार नगरात मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता सप्ताह; शिवसेना शाखेचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी** : विक्रोळी कन्नमवार नगरात मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शनिवार दि. ३१ पासून स्वच्छता सप्ताहास सुरुवात करण्यात आली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रभाग क्रमांक ११८ च्या नगरसेविका सौ.सुनिता चंद्रशेखर जाधव यांनी नारळ फोडून स्वच्छता सप्ताहाचा शुभारंभ केला.कन्नमवार नगरात सध्या टॉवर्स उभारली जात आहेत. विक्रोळीचे आमदार सुनीलभाऊ राऊत यांच्या माध्यमातून कन्नमवार नगराच्या रस्त्यांचे



डांबरीकरणाचे काम जवळ जवळ पूर्ण होत आले आहे.त्यामुळे कन्नमवार नगर खड्डेमुक्त झाले आहेत.वाढत्या लोकसंख्येमुळे व टार्वसची कामे चालू असल्यामुळेच बांधकामाच्या गाड्यांची वर्दळ आहे.त्यामुळे रस्त्यावर धुळ पसरली आहे.ही धुळमुक्त होण्यासाठी व कचरामुक्त होण्यासाठी स्थानिक नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सुनिता चंद्रशेखर जाधव यांनी पुढाकार घेतला आहे.शिवसेना शाखा क्रमांक ११८ यांनी सुध्दा यात सहभाग घेतला आहे.याप्रसंगी शिवसेना उबाठाचे विभाग प्रमुख परम यादव,उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव,शाखाप्रमुख अभय राणे व प्रकाश पुजारे,महिला उपविभाग संघटिका वंदना बेंद्रे,शाखा संघटिका आसावरी भोईटे,माजी महिला शाखाप्रमुख अहिल्या थोरवे आदि मान्यवरांसह शिवसैनिक उपस्थित होते.

---

## पवित्र दीक्षाभूमीवर संघदान संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग** : पवित्र दीक्षाभूमीवर दीक्षाभूमी स्मारक समिती भिक्ष्यु भिक्ष्युणी संघ उपासक - उपासिका यांच्या संयुक्तविद्यमाने संघदान करण्यात आले. प्रारंभी बुद्ध वंदना सुत्रपठण करून उपासक उपासिकांना धम्मदेशना प्रदान करण्यात आली. 75 भिक्ष्यु - भिक्ष्युणीसह 300 ते 400 उपासकासह प्रथम भोजनदान तसेच भिक्ष्यु -भिक्ष्युणी संघाला चिवरदान व अष्टपुरिष्कार दान प्रदान केले. तथागत भगवान बुद्धांच्या काळापासून संघदानाची एक महान परंपरा अविरत सुरू आहे. परंपरेनुसार पवित्र दीक्षाभूमीवर संघदानाचा कार्यक्रम संपन्न झाला. व बौद्ध धम्माच्या प्रसार प्रसाराच्या दृढ संकल्प करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास गजघाटे व भिक्खू संघानंद, भिक्खू प्रज्ञाज्योती, भिक्खू प्रियदर्शी, भिक्खू धम्मदेश, भिक्खू सम्यय, भिक्खू धम्मप्रकाश, भिक्खूणी



विशाखा, भिक्खुणी आम्रपाली, भिख्खूणी संघप्रिया, भिक्खूणी चंद्रशीला, उपासिका मायाताई जामगडे, कविता रामटेके, ज्योती वासनिक, उज्वला मेश्राम, शोभा खोब्रागडे, शीला मेंढे, मंगला खोब्रागडे, सुषमा शेंडे, प्रतिभा मदामे, लता डांगे, अलका जोडापे, अनिता भोरखडे, उपासक विठ्ठल धोंगळे, सुनील भोसले, देवाजी रंगारी, मिलिंद थुल, अशोक शेंडे, विशाल शुक्ला, रंजीत सूर्यवंशी, सुरेश वानखेडे, प्रदीप सोनवणे, या सहा इतर आणि कार्यक्रमाचे संचालन शरद मेश्राम यांनी केले तर सुनील भोसले यांनी आभार मानले.

---

## कर्कश बुलेट्सवर रिसोड पोलिसांचा घणाघात!

### ठाणेदार श्री.रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड शहरात मागील काही दिवसांपासून कर्कश आवाज करणाऱ्या बुलेट व मॉडिफाईड दुचाकी वाहनांनी नागरिकांना अक्षरशः हैराण करून सोडले होते. रात्री-अपरात्री होणाऱ्या गडगडाटामुळे लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्ती त्रस्त झाले होते. या पार्श्वभूमीवर ठाणेदार श्री. रामेश्वर चव्हाण यांनी तातडीने परिस्थितीची दखल घेत पोलिसांना थेट 'ॲक्शन मोड'मध्ये आणले.

ठाणेदार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रिसोड पोलिसांनी शहरातील मुख्य चौक, बाजारपेठ, बसस्थानक परिसर, शाळा-महाविद्यालय परिसर तसेच रहिवासी



भागात विशेष तपासणी मोहीम सुरू केली. मॉडिफाईड सायलेन्सर, मोठ्या आवाजाचे हॉर्न, अनधिकृत बदल केलेली वाहने यांच्यावर कोणतीही सूट न देता थेट कारवाई करण्यात येत आहे.

या मोहिमेदरम्यान अनेक बुलेट व इतर दुचाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून काही वाहनांचे सायलेन्सर जागेवरच काढून मानक सायलेन्सर बसविण्याचे आदेश देण्यात आले. नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांना समज देत भविष्यात अशा प्रकारची चूक केल्यास कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

ठाणेदार श्री. रामेश्वर चव्हाण हे कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत अत्यंत काटेकोर, नागरिकांच्या तक्रारींना तत्पर प्रतिसाद देणारे आणि गुन्हेगारीवर शून्य सहनशीलतेची भूमिका घेणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वामुळे पोलिस दलात शिस्त, आत्मविश्वास आणि कामगिरीत वेग आला आहे.

या कारवाईमुळे शहरात ध्वनिप्रदूषणावर आळा बसत असून नागरिकांनीही पोलिसांच्या या मोहिमेचे स्वागत केले आहे. अनेक पालक, ज्येष्ठ नागरिक आणि व्यापाऱ्यांनी ठाणेदार चव्हाण यांच्या या सकारात्मक उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

रिसोड पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या वाहनांमध्ये नियमबाह्य बदल करू नयेत, ध्वनिप्रदूषण टाळावे आणि वाहतूक नियमांचे पालन करावे. कायद्याचे पालन करणाऱ्यांना संरक्षण, तर नियम तोडणाऱ्यांना कठोर कारवाई— हीच पोलिसांची ठाम भूमिका असल्याचे ठाणेदार चव्हाण यांनी स्पष्ट केले.

---

## सिल्लोडच्या रणरागिणींची 'सेंद्रिय' भरारी! गांडूळ खत निर्मितीतून मंगरूळच्या ५० महिलांनी साधले आर्थिक सक्षमीकरण

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड** : महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आजही अनेकदा 'अबला ' असा असला, तरी प्रत्यक्षात प्रत्येक क्षेत्रात आर्थिक सक्षमीकरण करण्याची ताकद महिलांकडे आहे. हेच सिल्लोड तालुक्यातील मंगरूळ येथील महिलांनी सिद्ध करून दाखवले आहे. राज्याच्या कृषी विभागाच्या संकल्पनेतून आणि 'स्वयम् शिक्षण प्रयोग' संस्थेच्या सहकार्याने येथील महिलांनी गांडूळ खत निर्मितीचा यशस्वी प्रयोग राबवून



स्वावलंबनाच्या दिशेने दमदार पाऊल टाकले आहे.

गावातील महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता संसाराचा गाडा समर्थपणे हाकण्यासाठी सेंद्रिय खत निर्मितीचा मार्ग निवडला आहे. पर्यवेशिका निकिता जंजाळ आणि सखी वंदना मरकडे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली गावातील सुमारे ५० महिलांनी आजवर विविध प्रयोग राबवले आहेत. चूल व मूल यावर मर्यादित न राहता कुटुंबाला हातभार लावण्यासाठी स्वावलंबनाच्या दिशेने महिलांनी सुरू केलेली ही घोडदौड वाखण्याजोगी आहे.

गांडूळ खत निर्मितीची ही संकल्पना राबवताना 'स्वयम् शिक्षण प्रयोग' (SSP) संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक सम्राट कसबे, तालुका समन्वयक अर्चना कोळी, वैशाली घुगे, पुष्पा तुपे आणि शुभम कुमावत या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाची आखणी करण्यात आली. या प्रकल्पासाठी महिलांनी घेतलेली मेहनत आज सर्वत्र नजरेत भरत आहे.

मंगरूळ गावातील ही मोहीम यशस्वी करण्यासाठी निर्मला खेळवणे, कल्पना बर्डे, शितल मोडेकर, कीर्ती मोडेकर आणि वर्षा बोर्डे या महिलांनी अहोरात्र परिश्रम घेतले आहेत.

ग्रामीण भागातील महिलांनी पुरुषांच्या तुलनेत आपण कुठेही मागे नाही, हे या प्रकल्पाच्या माध्यमातून कृतीतून सिद्ध केले आहे.

---

## जय भवानी महाविद्यालयात स्वर्गीय ना. अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला. स्वर्गीय अजित दादा पवार यांना महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा घेऊन दोन मिनिटे मौन पाळुन त्यांना



श्रध्दाजंली वाहण्यात आली. या प्रसंगी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्र व बीड जिल्ह्याची कधी ही भरून न निघणारी हानी झाली आहे. त्यांच्या सारखा विकासाचा वादा देणाऱ्या एका कर्तबगार नेत्याला आज महाराष्ट्र कायमचा मुकला आहे. महाराष्ट्राच्या मातीचा खेळ कबड्डी खेळात केलेले काम सांगुन सर्वच क्षेत्रात त्यांचे योगदान मोठे होते. अशा शब्दात त्यांनी शोक व्यक्त करून त्यांच्या आतम्याला शांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली. या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद व बहुसंख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# कन्याभ्रूणहत्येविरोधात वाशिम प्रशासनाचे निर्णायक पाऊल!

## माहिती देणाऱ्यास थेट ₹१ लाखांचे बक्षीस — समाज परिवर्तनासाठी मोठी चळवळ

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम "निरागसतेला जगू द्या, मुलींचे स्वागत करू घरात" या भावनेतून कन्याभ्रूणहत्या व लिंगनिवडीस आळा घालण्यासाठी वाशिम जिल्हा प्रशासनाने समाजहिताचा आणि धाडसी निर्णय घेतला आहे. पीसीपीएनडीटी (गर्भधारणेपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान – लिंगनिवडीस प्रतिबंध) कायदा आणि एमटीपी (वैद्यकीय गर्भपात अधिनियम) कायद्याअंतर्गत गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांविषयी खात्रीशीर माहिती देणाऱ्या माहितीदारास तब्बल ₹१ लाख रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

कन्याभ्रूणहत्या हा केवळ कायद्याचा विषय नसून तो सामाजिक मानसिकतेशी जोडलेला प्रश्न आहे. आजही अनेक ठिकाणी मुलींच्या जन्माआधीच त्यांचा जीवनहक्क हिरावून घेतला जातो. परिणामी समाजातील लिंग गुणोत्तर बिघडत असून महिलांच्या सुरक्षिततेवर, स्वाभिमानावर आणि भविष्यावर याचा गंभीर परिणाम होत आहे. ही बाब लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि मुलींच्या संरक्षणासाठी कठोर भूमिका घेतली आहे.

पीसीपीएनडीटी समितीची महत्त्वपूर्ण बैठक



दि. २९ रोजी जिल्हा रुग्णालयात पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीला अध्यक्षा डॉ. अलका मकासरे, जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. अनिल कावरखे, ॲड. जी. डी. गंगावणे, डॉ. शिवनंदा आम्ले, डॉ. जया बिबेकर, डॉ. जे. एस. बाहेती, विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत लिंगनिवड चाचण्यांवर कडक नियंत्रण, बोगस सोनोग्राफी केंद्रांवर धडक कारवाई, तसेच माहिती देणाऱ्या नागरिकांचे संरक्षण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**नागरिकांसाठी सुवर्णसंधी — माहिती द्या, जीव वाचवा**

जर कोणत्याही डॉक्टर, दलाल किंवा संस्थेकडून गर्भलिंग तपासणी होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यास आणि त्या आधारे यशस्वी कारवाई झाली, तर संबंधित माहितीदारास ₹१ लाखांचे रोख बक्षीस देण्यात येईल. विशेष बाब म्हणजे माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असून त्याला कोणताही धोका निर्माण होणार नाही.

**नोंदणीसाठी:**
https://amchimulgimaha.in
संपर्कासाठी टोल फ्री:
१०४ | ८४५९८१४०६० | १८००२३३४४७५

**प्रशासनाचे स्पष्ट संदेश**

"कन्याभ्रूणहत्या हा केवळ गुन्हा नाही, तर समाजाच्या विवेकाला लागलेला डाग आहे. नागरिकांनी पुढाकार घेतल्यास अनेक निष्पाप जीव वाचू शकतात."
— जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

"या बक्षीस योजनेमुळे जनजागृती होईल व लिंगनिवडीस प्रतिबंध घालण्यास मदत होईल."
— मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहाण

"नागरिकांनी माहिती दिल्यास प्रशासन तत्काळ कारवाई करेल."
— जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे

तुमच्या एका माहितीतून एका चिमुकल्या जीवाला जीवन मिळू शकते…

मुलींचा जन्म साजरा करूया, समाजाचा दृष्टिकोन बदलूया!

---

## सीताबाई महाविद्यालयात अर्थशास्त्रातील रोजगार संधींवर व्याख्यान : डॉ. प्रसन्नजित गवई यांचे प्रेरणादायी व मोलाचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** अकोला दी बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष ॲड. मोतिसिंहजी मोहता व मानद सचिव डॉ. पवनजी माहेश्वरी यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. सिकची यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक ३० जानेवारी रोजी "भारतीय अर्थव्यवस्था व अर्थशास्त्रातील रोजगाराच्या संधी" या विषयावर विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रसन्नजित गवई होते. मार्गदर्शक म्हणून श्री कि. न. गो. महाविद्यालय, कारंजा येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नीलम छंगाणी उपस्थित होत्या. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी सांगितले की, आजच्या काळात विज्ञान व




वाणिज्य शाखेपेक्षा अर्थशास्त्रात अधिक व्यापक व विविध स्वरूपाच्या रोजगार संधी उपलब्ध आहेत. सांखिकी, नियोजन, बँकिंग, सार्वजनिक धोरण, संशोधन, प्रशासन, शिक्षण आदी क्षेत्रांत अर्थशास्त्राचा अभ्यास असलेले विद्यार्थीच प्रभावी कामगिरी करू शकतात.

पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की केवळ पदवी नव्हे, तर विषयाची सखोल समज, सातत्यपूर्ण अभ्यास व चिकाटीच्या बळावर अर्थशास्त्राचा विद्यार्थी निश्चितच चांगला रोजगार मिळवू शकतो. आजचा विद्यार्थी फक्त नोकरी शोधणारा नसून रोजगार निर्माण करणारा व्हावा, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. प्रसन्नजित गवई यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करताना सांगितले की, अर्थशास्त्र हा विषय समाज व राष्ट्राच्या प्रगतीशी जोडलेला आहे. विभागप्रमुख म्हणून त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रम, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, अतिथी व्याख्याने व संशोधन उपक्रम राबवून विभागाला नवी दिशा दिली आहे. त्यांच्या सकारात्मक नेतृत्वामुळे अर्थशास्त्र विभाग महाविद्यालयात एक सक्षम व प्रेरणादायी विभाग म्हणून ओळखला जात आहे.

कार्यक्रमात विभागाच्या वतीने अतिथींचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्राची पाटील यांनी केले तर आभार प्रा. समीक्षा इंगळे यांनी मानले.

कार्यक्रमाला प्रा. प्रतिभा येवले, प्रा. अमृता बेंद्रे, प्रा. शुभम खराटे, प्रा. कीर्तिका चोरे, प्रा. जयस्वाल उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

---

## स्वीप कार्यक्रमांतर्गत उरण तालुका मतदान जनजागृती बाईक रॅली संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण :** स्वीप कार्यक्रमांतर्गत उरण तालुका निवडणूक अधिकारी मान आविशकुमार सोनावणे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मान. उद्धवजी कदम साहेब व स्वीप पथक प्रमुख मा. निर्मला घरत मॅडम गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या १६ तारखेपासून विविध गावांमध्ये जाऊन मतदान जनजागृती सुरू आहे. ३० जाने.शनिवारी नवीन शेवेतून उरण तालुक्यातील सर्व शिक्षकांची मतदान जनजागृती बाईक रॅली नवीन शेवे ते दिघोडे पर्यंत काढण्यात आली. या बाईक रॅलीचा शुभारंभ निवडणूक निर्णय अधिकारी माननीय सोनावणे सर तहसीलदार डॉ. उद्धव कदम व निर्मला घरत मॅडम, केंद्रप्रमुख स्वीप कार्यक्रमातील सर्व शिक्षक वर्ग



व तालुक्यातील सर्व शिक्षक बंधू भगिनी यांना "मी मतदान करणारच" नावाची टी-शर्ट देऊन हातामध्ये विविध मतदान जनजागृती बॅनर घेऊन काढण्यात आली. यावेळी मतदान जनजागृतीच्या वेगवेगळ्या मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, "मी मतदान करणारच"," चला मतदान केंद्रावर जाऊ या मतदानाचा हक्क बजाऊ या"... घोषणा देण्यात आल्या.नवीन शेवे येथून निघालेली रॅली बोकडवीरा जेएनपीटी जासई मार्गे दिघोडे येथे समाप्त करण्यात आली.

---

## सणसर–लासुर्णे गटात राष्ट्रवादी कॉँग्रेसची कार्यकर्ता संवाद बैठक सणसर येथे संप्पन्न

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती इंदापूर तालुक्याच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर सणसर–लासुर्णे पंचायत समिती व जिल्हा परिषद गटात निवडणूकीची प्रचाराची सुरुवात करण्यात आली.या निमित्ताने शुक्रवार दि 31 जानेवारी रोजी कार्यकर्ता संवाद बैठकीचे आयोजन भैरवनाथ मंदिरासमोर करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील अप्पासाहेब जगदाळे,मुरलीधर निंबाळकर मधुकर भरणे सचिन सपकळ विद्यमान सरपंच यशवंत पाटील पार्थ निंबाळकर,रणजित निंबाळकर सागर भोईटे विलास माने,संग्रामसिंह निंबाळकर उपस्थित होते.

सणसर–लासुर्णे जिल्हा परिषद गटातून सौ.माधुरी सागर भिसे तर पंचायत समिती गणातून कु.ज्योत्सना मोहन सुरुडकर या अनुसूचित जाती महिला प्रवर्गातील उमेदवार असून त्यांना बहुमताने निवडून देण्यात यावे म्हणून प्रत्येक गावातील प्रमुख व्यक्तीने आपआपली मते मांडण्यात आली.

ही निवडणूक ज्येष्ठ नेते शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून स्वर्गीय राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार,महाराष्ट्र राज्याचे मंत्री दत्तात्रय (मामा) भरणे,मा.मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्यासह विविध पक्षांचे दिग्गज नेते एकत्र असल्याचे चित्र दिसून येत आहे.त्यामुळे इंदापूर तालुक्यातील ही निवडणूक केवळ स्थानिक स्तरापुरती मर्यादित न राहता राज्यपातळीवरही लक्षवेधी ठरली आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सणसर–लासुर्णे गटातील सामाजिक कार्यकर्ते,विविध क्षेत्रांतील नागरिक तसेच तालुक्यातील अनेक मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.निवडणूक प्रक्रियेच्या काळात राष्ट्रवादी कॉँग्रेसला मोठा धक्का बसला असल्यामुळे नागरिकांमधून घड्याळ चिन्हाची चर्चा मतदार सहभाग आणि स्थानिक प्रश्नांवर संवाद करून सहानभूतीचे वातावरण तयार झाले आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी उपाध्यक्ष वसंतराव जगताप तर आभार सागर भोईटे यांनी केले.

---

## सीकेटी महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेट गोल्डन सीनियर अंडर ऑफिसर वेदिका महाबरे यांचे दिल्लीतील प्रजासत्ताक दिनी संचलन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची एनसीसी कॅडेट गोल्डन सीनियर अंडर ऑफिसर वेदिका प्रमोद महाबरे यांची दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड झाली होती. वेदिका महाबरे हि एस.वाय.बी.ए.च्या विद्यार्थिनी असून, त्यांनी अत्यंत कठोर व सातत्यपूर्ण प्रशिक्षणातून यशस्वी वाटचाल केली आहे. त्यांनी सलग चार वार्षिक प्रशिक्षण शिबिरे पूर्ण केली असून, दोन प्री-इंटर ग्रुप कॅम्पसाठी निवड होऊन पूर्ण निष्ठा, शिस्त आणि समर्पणाने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.

याच उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्यांची इंटर ग्रुप सिलेक्शन कॅम्पसाठी निवड झाली, जो राज्यस्तरीय स्तरावरील मानाचा कॅम्प आहे. पुढे, त्यांची रिपब्लिक डे परेड कॅम्प २०२६ साठी निवड झाली असून, त्यांनी राजपथ, नवी दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिन संचलनात प्लाटून कमांडर म्हणून गौरवास्पद सहभाग नोंदविला होता. हे राज्यासाठी, बटालियनसाठी तसेच चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट व पनवेल परिसरासाठी अत्यंत



अभिमानास्पद व गौरवास्पद बाब आहे. गोल्डन सीनियर अंडर ऑफिसर वेदिका महाबरे यांच्या या यशामागे त्यांच्या माता-पिता, महाविद्यालयाचे प्राचार्य, असोसिएट एनसीसी ऑफिसर, केअर टेकिंग ऑफिसर तसेच सर्व शिक्षकवर्गाचे मोलाचे मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रोत्साहन लाभले आहे. ३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, मुंबई 'A' ग्रुप अंतर्गत वेदिका महाबरे यांनी उत्कृष्ट शिस्त, प्रभावी नेतृत्वगुण, उत्तम शारीरिक तंदुरुस्ती व राष्ट्रीय सेवेच्या भावनेच्या जोरावर ही मानाची निवड मिळवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयासह संपूर्ण परिसरात आनंद व अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील, एएनओ प्रा. निलीमा तिदार, सीटीओ प्रा. सागर एस. व्यवहारे तसेच आयक्यूएसी समन्वयक प्रा. बी. डी. आघाव यांनी वेदिका यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. दिल्लीतील प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी होण्याची संधी मिळणे हे प्रत्येक एनसीसी कॅडेटसाठी अत्यंत गौरवाची बाब मानली जाते. वेदिका महाबरे यांच्या या यशामुळे महाविद्यालय व महाराष्ट्र एनसीसी युनिटचा मान अधिक उंचावला आहे.

---

# उरणमध्ये दाटले हुंदके दादा गेल्याच्या भावनेने नगराध्यक्षांना अश्रू अनावर

## भोईर गार्डनमध्ये महाविकास आघाडीच्या शोकसभेतून भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक झंजावात उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या निधनाने अवघा महाराष्ट्र पोरका झाला आहे याच दुःखद घटनेचे सावट उरण मध्येही पाहायला मिळाले. उरण मध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या वतीने भोईर गार्डन येथे एका विशेष लोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित नेते आणि कार्यकर्त्यांनी दादांसोबत च्या आठवणींना उजाळा देताना आपल्या लाडक्या नेत्याला साश्रूपुर्ण नयनांनी निरोप दिला. राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या



उपप्रदेशाध्यक्ष तथा उरणच्या नगराध्यकक्षा भावना घाणेकर यांच्यासाठी हा प्रसंग अत्यंत कठीण होता. पवार कुटुंबाशी त्यांचे कौटुंबिक ऋणानुबंध असून अजित दादा सोबत त्यांचे सख्या भावाप्रमाणे नाते होते. दादा आपल्यात नाहीत हे मन आजही मान्य करायला तयार नाही. अशा शब्दात भावना व्यक्त करताना त्यांना अश्रू अनावर झाले. दादांसोबत वीस वर्षे काम करण्याची मिळालेली संधी आणि त्यांच्या विकासाच्या दूरदृष्टीच्या अनुभव मांडताना घाणेकर या कमालीच्या भावुक झाल्या होत्या.

माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी दादांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. "दादांच्या प्रशासनावर दांडगे नियंत्रण होते ते ,जितके शिस्तीचे कठोर होते तितकेच मनातून प्रेमळ होते .दादांनी एखाद्या कामाचे निवेदन हातात घेतले याची दखल घेतली गेली नाही असे कधीच घडले नाही." असे उद्गार माझी शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी काढले. माजी आमदार मनोहर भोईर यांनी श्रद्धांजली वाहताना सांगितले की, "दादांच्या जाण्याने एक महाराष्ट्राचा एक हवाहवासा आणि विकासाचा भक्कम आधार निकला आहे पवार कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. असा लोकनेता पुन्हा होणे अशक्य आहे"

या शोक सभेला माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते पत्रकार आणि महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या चेहऱ्यावर दादांच्या अचानक जाण्याचे दुःख स्पष्टपणे जाणवत होते. शोक सभेत दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उरणच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासात अजित दादांचे स्थान किती अढळ आहे ते या सभेतील जनसागरावरून दिसून आले दादा गेले असले तरी त्यांच्या कामाची पावती आणि आठवणी उरण करांच्या मनात सदैव राहतील.

---

## यूनिवर्सल शैक्षणिक संस्था चा स्नेह सम्मेलन कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/नागपूर :** युनिवर्सल कॉन्व्हेन्ट चे चांदमारी नगर, पवन शक्ती नगर वाठोडा लेआउट नागपूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य शुभम रमेश गणवीर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून शुभम मोटघरे, (नवनियुक्त नगरसेवक) विक्रम खुराणा (सामाजिक कार्यकर्ते), प्रा. वृषाली बोलधन, पार्थ गहाणे (प्रा. जिंगल बेल्स नागपूर), कैलास नागपुरे, प्रलय गणवीर, अविनाश खळोदे, मंगेश बांगडे,रंजीत राऊत,वकील शेख, उपस्थित होते आणि यूनिवर्सल कॉन्वेंट आणी ट्यूशन चे सर्व पालक वर्ग मान्यवर उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमच्या पहिल्या दिवसामध्ये क्रीडा स्पर्धा, सामान्य ज्ञान, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, आनंद मेळावा, असे कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या दिवशी पारितोषिक वितरणाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमादरम्यान सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचा




सत्कार करण्यात आला आणि दरवर्षी प्रमाणे वर्षातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी 1) तनवीर विक्की लिल्लोर 228.5/240=95.28% 2) द्रितिका दीपक रंगारी 215/240=89.58% यांना पुष्पगुच्छ, पदक, ट्रॉफी, शालेय प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शेवटी जेवणाचे आयोजन केले होते!समा गणवीर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केलेव सहाय्यक शिक्षिका दीक्षा, हसीना, आंचल उपस्थित होते. नृत्य दिग्दर्शन खुशी मॅडम आणि कार्यक्रमाचे छायाचित्र व व्हिडीओ निखिल फोटोग्राफर पहेला, भंडारा यांनी केले. समा गणवीर यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.

# पूर्णा येथे २३ वी बौद्ध धम्म परिषद; कोरियातील आंतरराष्ट्रीय भिक्षू व उपासकांची ऐतिहासिक उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी पुर्णा/शिवाजी लोंढे :** बुद्ध विहार समिती, पूर्णा (रजि.) यांच्या वतीने २३ वी बौद्ध धम्म परिषद भव्य व ऐतिहासिक स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद स्मृतिशेष भदन्त उपाली थेरो यांच्या ४३ व्या स्मृतिदिनानिमित्त तसेच त्यांच्या चैत्याच्या उद्घाटनप्रसंगी संपन्न होणार असून, हा सोहळा बौद्ध धम्म चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.ही दोन दिवसीय बौद्ध धम्म परिषदशनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ वरविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.परिषदेचे आयोजन बुद्ध विहार, भदन्त उपाली थेरो नगर, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी (महाराष्ट्र) येथे करण्यात आले आहे.या परिषदेसाठी दक्षिण कोरिया येथील नामवंत व आंतरराष्ट्रीय स्तरावरील बौद्ध भिक्षू व उपासकांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. यामध्येउपासक यम-ज्युंग हो (माजी आंष्टीबाट महोत्सव, कोरिया),उपासक जंग सुंगीर (माजी सरचिटणीस, डोंगवासा टेम्पल, दक्षिण कोरिया),उपासक किम डॉग ग्वे,उपासिका अन नागियम,भदन्त डॉ. ली. ची. रेंन वभदन्त वॉनमीएन्ग(सर्व – दक्षिण कोरिया)यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



या परिषदेमध्ये बौद्ध धम्मावरील सखोल प्रवचने, धम्म मार्गदर्शन, स्मृतिशेष भदन्त उपाली थेरो यांना अभिवादन, स्मृतिपूजन तसेच त्यांच्या चैत्याचे उद्घाटन असा धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. भदन्त उपाली थेरो यांनी आयुष्यभर बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारासाठी दिलेले योगदान स्मरणात ठेवून ही परिषद आयोजित करण्यात आली असल्याचे आयोजकांनी सांगितले.या ऐतिहासिक परिषदेसाठी महाराष्ट्रासह विविध जिल्ह्यांतील तसेच देश-विदेशातील धम्मबंधू मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे. बौद्ध धम्मातील आंतरराष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवणारी ही परिषद पूर्णा शहरासाठी गौरवाची बाब ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.बुद्ध विहार समिती, पूर्णा यांनी सर्व धम्मबंधू, नागरिक व समाजबांधवांना या २३ व्या बौद्ध धम्म परिषदेस उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# जे प्राईम बिल्डकॉनच्या 'जे प्राईम स्वास्तिक' टाउनशिप प्रोजेक्टसाठी भव्य चॅनेल पार्टनर्स मेळावा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** जे प्राईम बिल्डकॉन यांच्या आगामी 'जे प्राईम स्वास्तिक' या भव्य टाउनशिप प्रोजेक्टसाठी आयोजित चॅनेल पार्टनर्स मेळावा वाशी येथील आयलीफ ग्रँड बँकवेट्स येथे अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास नवी मुंबई व मुंबई परिसरातील नामवंत व 600 + प्रख्यात चॅनेल पार्टनर्स यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.कार्यक्रमाला अभिनेत्री उर्मिला कानेटकर यांनी विशेष उपस्थिती लावली. दुनियादारी आणि काकण यांसारख्या चित्रपटांमधून प्रेक्षकांची मने जिंकलेल्या उर्मिला कानेटकर यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष शोभा आली. कलाकार ओम यादव यांनी आपल्या प्रभावी





आवाजातील संगीतांमुळे कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली. आंतरराष्ट्रीय बिझनेस कोच दिलीप औटी यांनी चॅनेल पार्टनर्ससाठी विशेष मोटिव्हेशनल सेशन घेतले. त्यांनी नियोजनबद्ध कामकाज, व्यवसायातील अडचणींवर मात करून सक्षम उद्योगनिर्मिती कशी करता येईल, याबाबत मार्गदर्शन केले. जे प्राईम बिल्डकॉनचे मॅनेजिंग डायरेक्टर अविनाश जगदाळे यांनी उपस्थित चॅनेल पार्टनर्सचे स्वागत करत संस्थेच्या वाटचालीची माहिती दिली. जे प्राईम बिल्डकॉन आपल्या सर्व बिझनेस पार्टनर्सना कुटुंबातील सदस्यांप्रमाणे मानते, अशी भावना व्यक्त करत त्यांनी सांगितले की सध्या या कुटुंबाची संख्या 800 हून अधिक झाली आहे. जे प्राईम बिल्डकॉन लवकरच होम ओनर्स, चॅनेल पार्टनर्स, प्रॉपर्टी खरेदीदारांसाठी



एक अभिनव डिजिटल यंत्रणा रियल इस्टेट बाजारात आणणार असून त्याची अधिकृत घोषणा लवकरच केली जाणार आहे. आतापर्यंत जे प्राईमने 850 कुटुंबांचे घराचे स्वप्न पूर्ण केले असून, 2030 पर्यंत हा आकडा 6000 पर्यंत नेण्याचा संकल्प 'संकल्प 2026' च्या माध्यमातून करण्यात आला आहे.येत्या काही वर्षांत 3 ते 4 हजार नवीन रोजगार संधी निर्माण करण्याच्या दिशेने जे प्राईम बिल्डकॉन सक्रियपणे कार्यरत आहे. तसेच नैना, एमएसआरडीसी, एमएमआर क्षेत्रातील मुंबई 3.0 पट्ट्यात सुमारे 170 एकरांची भक्कम लँड बँक संपादन करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली, जिथे विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारले जाणार आहेत.

तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देताना त्यांनी सांगितले की, जे प्राईम केवळ घरे उभारत नाही तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बांधकामाची गुणवत्ता वाढवून प्रकल्प कमी कालावधीत पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. इमारत विटा, रेती आणि सिमेंटने उभी राहते; पण रियल इस्टेटमधील नाती ही केवळ विश्वासावर उभी असतात असे जगदाळे यांनी सांगितले.

# शेटफळगढे गणात अजितदादा पवार यांचा निष्ठावंत कार्यकर्ता सौरभ झगडे यांची अपक्ष उमेदवारी

## अपक्ष उमेदवारीने गणातील समीकरणात मोठा होणार बदल

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील शेटफळगढे पंचायत समिती गणातील निवडणुकीसाठी परिसरात राजकीय हालचालींना वेग आला असून तरुण नेतृत्व म्हणूनशिंदेवाडी गावचे युवा सरपंच मा.सौरभ गणेशकुमार झगडे यांच्या नावाची चर्चा सध्या गणातील युवकांमध्ये जोरात सुरु आहे.सामाजिक बांधिलकी लोकसंपर्क व विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे स्थानिक युवकांच्यात श्री.सौरभ गणेशकुमार झगडे यांच्यावर वाढता विश्वास मतदारांमध्ये दिसून येत आहे काही शिंदेवाडी व परिसरातील गावातील युवकांना नोकरीच्या पाठीमागे न लागता स्वतःचा व्यवसाय करावा अश्या प्रकारचे मार्गदर्शन करण्यात येत असल्यामुळे व भरपूर युवकांना



रोजगारासाठी मदत केली असल्यामुळे मा सौरभ झगडे यांच्यावर गावागावातील युवकांचा वेगळाच विश्वास निर्माण झाला असल्याचे युवकांमध्ये चर्चा आहे

मा.सौरभ झगडे हे विविध सामाजिक,शैक्षणिक आणि क्रीडा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागी होत असून अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी तालुक्यात विविध उपक्रम राबविलेले जातात मागील वर्षी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील जवळपास 40 हजार विध्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा वहिनी पवार यांच्या हस्ते घेण्यात आला होता.तसेच दुर्बल युवकांना एकत्र करून ग्रामविकासाची दिशा दाखवत असतात गावातील रस्ते पाणीपुरवठा शिक्षण आणि आरोग्यविषयक समस्या दूर करण्यासाठी त्यांनी ग्रामपंचायत शिंदेवाडी मार्फत मोठी विकासकामे सातत्याने स्व अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. युवा,उत्साही आणि स्वच्छ प्रतिमेचे युवा नेतृत्व म्हणून मा.सौरभ गणेशकुमार झगडे यांच्या अपक्ष उमेदवारीमुळे स्थानिक युवक वर्ग शेतकरी आणि महिला मंडळांकडे चाचपणी केली असता त्यांच्या उमेदवारीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

पंचायत समिती गणाच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न आणि लोकसेवा हीच माझी दिशा असेल असे मत इच्छुक उमेदवार मा.सौरभ गणेशकुमार झगडे यांनी व्यक्त केले शेटफळगढे गणातील पंचायत समितीच्या उमेदवारीमुळे लाकडी निंबोडी काझड निरगुडे शेटफळगढे म्हसोबावाडी अकोले वायसे वाडी परिसरातील मतदारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे स्थानिक युवकांचा कल आणि जनसंपर्क पाहता ही निवडणूक मा.सौरभ गणेशकुमार झगडे यांच्या बाजूने होण्याची चिन्हे आताच दिसत आहेत.

# टि.बी. मुक्त ग्रामपंचायत अंतर्गत उत्कृष्ट कार्य केलेल्या ग्रामपंचायतीना बक्षिस वितरण सोहळा





**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/राजु गायकवाड (मोहदरी) :** पुसद येथील 28 ग्रा.पं.चा गौरव सोहळा पार पडला सदर कार्यक्रम पंचायत समिती पुसद येथील सभागृहात घेण्यात आला होता TB मुक्त ग्रामपंचायत अभियान 2025 अंतर्गत 28 ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला त्यांना कांस्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी मा.जिल्हा आरोग्य अधिकारी श्री.सुभाष ढोले साहेब आणि मा. जिल्हा क्षयरोग अधिकारी श्री.सागर जाधव साहेब मा. तालुका आरोग्य अधिकारी डॉ नामदेव सरकुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी अध्यक्षस्थानी मा.नायब तहसीलदार श्रीमती लता राठोड मॅडम, श्री संतोष डाखोरे विस्तार अधिकारी, उपस्थित होते.अभियानात यशस्वी कामगिरी करणाऱ्या 28 ग्रा.प.यांना महात्मा गांधी यांची प्रतिकृती आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. TB मुक्त ग्राम पंचायत अभियान पुरस्कार सोहळयामध्ये सर्व संबंधित ग्रामपंचायतचे आदरणीय सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# ब्रम्हा येथे दारूबंदीबाबत ९ फेब्रुवारी रोजी मतदान; महिला मतदारांचा कौल ठरणार निर्णायक

## सकाळी ८ ते सायंकाळी ५ पर्यंत मतदान

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील :** वाशिम तालुक्यातील मौजे ब्रम्हा, येथे असलेल्या ऋषी रेस्टॉरंट अँण्ड बाईन बार यांची मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करावी अथवा नाही, याबाबत दारूबंदी निवडणूक घेण्यात येणार असून, ही निवडणूक दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिलेल्या आदेशान्वये सदर मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी वाशिम तहसिलदार निलेश पळसकर यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच तहसिलदार, वाशिम यांचे आदेश क्रमांक जा.क्र. म.स./सा.नि./ कावि/२४/२०२६, दिनांक २३ जानेवारी २०२६ अन्वये नायब तहसिलदार, ही.एस. आडे यांना निवडणूक प्रक्रियेची जबाबदारी देण्यात आली आहे.

**मतदान केंद्रांचा तपशील**

३४ – वाशिम (अ.जा.) विधानसभा मतदार संघातील मतदार यादी भाग



क्र. ३३० व मतदान केंद्र क्र. १ मधील मतदारांसाठी : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, ब्रम्हा, खोली क्र. १ (पूर्वेकडील भाग)

मतदार यादी भाग क्र. ३३१ व मतदान केंद्र क्र. २ मधील मतदारांसाठी : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, ब्रम्हा, खोली क्र. २ (पूर्वेकडील भाग)

**मतदान व मतमोजणी**

मतदानाची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील.

मतमोजणी दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ब्रम्हा येथे होणार असून, निकाल तात्काळ जाहीर करण्यात येणार आहे.

**महिला मतदारांचा अधिकार**

शासन राजपत्रातील तरतुदीनुसार, दि. २९ ऑक्टोबर २०२४ रोजी अस्तित्वात असलेल्या मतदार यादीतील (भाग क्र. ३३० ते ३३१) नाव समाविष्ट असलेल्या महिला मतदारांनाच या मतदानात सहभागी होता येणार आहे.

सदर यादीतील एकूण महिला मतदारांच्या किमान ५० टक्क्यांपेक्षा अधिक मतदारांनी मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मतदान केल्यास, ग्रामपंचायत ब्रम्हा हद्दीतील मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यामार्फत देण्यात येणार आहेत.

सदर मतदानासाठी वापरण्यात येणारी मतपत्रिका शासन राजपत्रातील परिच्छेद ९ मध्ये नमूद नमुन्यानुसार असणार आहे. असे निवडणूक नायब तहसिलदार तथा प्राधिकृत अधिकारी सी.एस.आडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# आमखेडा–निंबायतीत बदलाची लाट;तीन महिला उमेदवारांच्या रूपाने शिवसेनेला मतदारांचा कौल

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे /सोयगाव :** आमखेडा जिल्हा परिषद गट व अंतर्गत आमखेडा आणि निंबायती गणांमध्ये यंदाच्या निवडणुकीत बदलाची स्पष्ट लाट निर्माण झाली असून, शिवसेनेच्या महिला उमेदवारांना नागरिक,महिला व युवकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.आमखेडा जिल्हा परिषद गटातून सौ.मोनालीताई पिता राजेंद्र राठोड,आमखेडा गणातून सौ.मंगलाबाई सुनिल निकम तर निंबायती गणातून सौ.सविताताई सोपान दादा गव्हाडे,पाटील या तिन्ही महिला उमेदवार यंदा निवडणूक रिंगणात असून, त्यांच्या उमेदवारीमुळे संपूर्ण गट व गणात नवचैतन्य निर्माण झाले आहे.मागील पाच वर्षांच्या कालावधीत एकही ठोस विकासकाम न झाल्याची तीव्र नाराजी मतदारांमध्ये दिसून येत आहे.केवळ आश्वासनांवर वेळ घालवण्यात आला, युवकांसाठी रोजगार, क्रीडा, प्रशिक्षण यासारखी कोणतीही ठोस कामे झाली



नाहीत, महिलांसाठीही मूलभूत सुविधा व सक्षमीकरणाच्या दृष्टीने विकासकामे अपुरीच राहिल्याचा सूर नागरिक व्यक्त करत आहेत.यामुळेच “यावेळी नक्की बदल होईल” अशी भावना महिला,युवक व सर्वसामान्य नागरिकांमध्ये ठामपणे व्यक्त होत असून,यंदा शिवसेनेचा भगवा फडकणार असा विश्वास मतदार बोलून दाखवत आहेत.दरम्यान,शिवसेनेचे छत्रपती संभाजीनगर उपजिल्हाप्रमुख आबासाहेब काळे व खरेदी विक्री संघाचे सभापती राजूभाऊ राठोड हे प्रत्येक गावात प्रत्यक्ष गाठी,भेटी,संवाद व संपर्क साधत असून, त्यांच्या प्रयत्नांना गावोगावी मोठा प्रतिसाद मिळत आहे. थेट लोकांपर्यंत पोहोचून प्रश्न ऐकून घेण्याच्या भूमिकेमुळे शिवसेनेबद्दल सकारात्मक वातावरण तयार झाले आहे.या संपूर्ण प्रक्रियेत मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान दादा गव्हाडे पाटील यांचे मार्गदर्शन व सामाजिक योगदानही महत्त्वाचे ठरत असून,त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण भागात संघटन अधिक बळकट झाले असल्याचे चित्र आहे.एकूणच आमखेडा गट व आमखेडा–निंबायती गणात महिला नेतृत्वाच्या माध्यमातून विकासाची नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत असून यंदाची निवडणूक बदल घडवणारी ठरेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

# पेण खारेपाटाला पाण्यापासून वंचित ठेवणारे येथील लोकप्रतिनिधी - संजय जांभळे

**दैनिक युवक आधार**

**पेण, दीपक लोके :** पेण तालुक्यातील वाशी खारेपाट विभागाच्या सर्वसामान्य जनतेला गेल्या साठ सत्तर वर्षापासून पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवणारे येथील सत्ताधारी आमदार रविशेठ पाटील आणि खासदार धैर्यशील पाटील हे दोन्ही लोकप्रतिनिधी असल्याचा घनघात शेकापक्षाच्या वडखळ जिल्हा परिषद गटाचे उमेदवार संजय जांभळे यांनी आपल्या प्रचाराच्या शुभारंभावेळी केले.२३ वडखळ जिल्हा परिषद गटातील शेकापक्ष उमेदवार संजय जांभळे यांच्या प्रचाराचा श्रीफळ



वडखळ इंद्रनगर येथील क्षेत्रेश्वर मंदिरात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाढविण्यात आला आहे.गेल्या अनेक वर्षापासून येथील जनतेची दिशाभूल स्थानिक लोकप्रतिनिधी करत असून ते या निवडणुकीत पुन्हा उमेदवार उभे राहिले आहेत.मात्र कामांच्या बाबत ते निष्क्रिय असल्याने त्यांनी नेहमीच जनतेची दिशाभूल केली आहे.याउलट आपणांकडे प्रशासनाकडून जनतेची कामे कशी मार्गी लागतील याचा अनुभव असल्याने येथील जनतेचा वाढता पाठिंबा पाहता विरोधक खऱ्या अर्थाने हतबल झाले आहेत.एकीकडे आदानीचे स्मार्ट मिटर लावून जनतेची लुट शासन करीत असल्याने नागरिकांनी याला वेळीच आळा घातला पाहिजे माझ्या विरोधात उभ्या असलेल्या प्रभाकर म्हात्रे यांनी येथील जनतेची कोणती कामे केली आहेत ते दाखवून द्यावे असे यावेळी संजय जांभळे म्हणाले.तर शेकाप राज्य खजिनदार अतुल म्हात्रे म्हणाले की प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार न करून देणारा एकमेव नेता म्हणजे संजय जांभळे आहे. आजवर त्यांनी येथील जनतेसाठी अनेक विकासात्मक कामे केली असून अहोरात्र जनतेसाठी धावून येणारा असल्याने येत्या ७ तारखेला जिल्हा परीषद निवडणूकीचे उमेदवार संजय जांभळे आणि पंचायत समिती गणाच्या उमेदवार ललिता म्हात्रे हे दोन्हीं शेकापक्षाचे उमेदवार निश्चितच निवडून येतील यात तिळमात्र शंका नसल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी संजय जांभळे आणि ललिता म्हात्रे यांच्या प्रचारार्थ वडखळ, इंद्रनगर, नवेगाव, कोळवे या भागात प्रचार रॅली काढण्यात आली सदर प्रचार रॅलीत नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# खोंडे उद्यानात सामूहिक सूर्यनमस्काराला उत्तम प्रतिसाद !

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/ नागपूर विभाग :** महाल बहूउद्देशिय सांस्कृतिक मंडळ, संजीवनी प्राणायाम आणि गार्डन फ्रेंड्स यांच्या संयुक्त विद्यमाने खोंडे उद्यान मध्ये रथसप्तमीच्या पावन पर्वावर आयोजित सामूहिक सूर्यनमस्कारास उत्सपूर्त प्रतिसाद मिळाला.




यावेळी पारंपरिक पध्दतीने द्विप प्रज्वलन करून आणि स्वामी जनार्दन महाराजांच्या फोटोस पुष्प हार घालून कार्यक्रम सुरु करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून शहरातील प्रसिद्ध डॉ. जीवेश पंचभाई होते. कार्यक्रमाचे आयोजन अनीलजी मानापुरे यांनी केले होते. सूर्यनमस्कार व प्राणायाम केल्याने शरीराचा संपूर्ण व्यायाम होतो. शरीर बलवान होते, लवचिक होते, आंतरीक व बाह्य शरीर पवित्र होते. एक सुधरूढ समाज निर्माण होतो असे प्रतिपादन जीवेश पंचभाई यांनी केले. सूर्यनमस्कारामध्ये संजीवनी प्राणायाम व गार्डन फ्रेंड्सचे सर्व साधक साधिका तसेच परिसरातील नागरिकानी तसेच प्रबोधन कॉनव्हेन्ट व जामदार हायस्कूल मधील विध्यार्थी व शिक्षक वृंद ईत्यांदीनी भाग घेतला.

यावेळी कार्यक्रमाला नवनिर्वाचित नगरसेवक श्रीकांत आगलावे, बंडूजी राऊत, सचिन नाईक, वैशाली उदापूरकर, सारिका नांदुरकर यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुछ देवून सत्कार करण्यात आले. सूर्यमंत्राचे बिजवाचन अंजनाताई चरडे व प्रत्यशिक रवींद्र वैद्यनी करून दाखविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल मानापुरे यांनी तर संचालन सुरेंद्र त्रिवेदी यांनी व आभार प्रदर्शन काशिनाथ मटाले यांनी केले. अनील मानापुरे, काशिनाथ मटाले, अविनाश काईलकर, डॉ. गोपालदास मोहता, रवींद्र वैद्य, वर्षा दूरगकर, अंजनाताई चरडे, विजया मेनकुदळे, सुवर्णा देव, सविता मेढेकर, राजूभाऊ महल्ले, आनंद वानखेडे, शालिनी मानापुरे आदींनी कार्यक्रम यशस्वीरित्या परिश्रम घेतले.

# कारंजा तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन”

## कुसुम ‘स्पर्श’ कुष्ठरोग जनजागृती अभियानाला सुरवात

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधीरणजितसिंह. ठाकुर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय कारंजा येथे करण्यात. या अभिवादन कार्यक्रमाला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एस. आर नांदे, कुष्ठरोग पर्यवेक्षक एम.डी खडतडे, आरोग्य सहाय्यक विनोद श्री राव, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित सर्वांचे हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आले. डॉ. नांदे यांनी सांगितले कि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सामाजिक समतेचा आणि मानवतेचा संदेश देताना




कुष्ठरोगग्रस्त व्यक्तींविषयी असलेले गैरसमज, भीती व भेदभाव दूर करण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्या काळात कुष्ठरोगाला सामाजिक कलंक मानले जात असताना गांधीजींनी प्रत्यक्ष कृतीतून मानवतेचे दर्शन घडवले. कुष्ठरोगाविषयी समाजात असलेली भीती, अंधश्रद्धा आणि भेदभाव दूर करून रुग्णांना सन्मानाची वागणूक देण्यासाठी 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारी 2026 या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात ‘स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान’ आणि ‘कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियान’ राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या अनुसगाने कारंज्यातील नागरिकांना या अभियानात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

या अभियानामध्ये नियमित सर्वेक्षणासोबतच समाजातील वंचित घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. यामध्ये वीटभट्टी कामगार, खाणकामगार, कारखान्यातील मजूर, कारागृहातील बंदी, तसेच आश्रमशाळा आणि वसतिगृहातील विद्यार्थ्यांची विशेष तपासणी केली जाणार आहे. कुष्ठरोगाची कोणतीही लक्षणे आढळल्यास घाबरून न जाता तातडीने आपल्या जवळच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधावा आणि उपचार पूर्ण करावेत, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाला उपस्थित कुष्ठरोग तज्ञ श्री किसन जाधव, क्षयरोग विभागाचे निलेश पाटील लेखा अधिकारी गणेश बाळहे, क्षयरोग विभाग प्रदिप पट्टेबहादूर, कार्यक्रम सहाय्यक सीमा जाधव, कीटक तज्ञ राजश्री धालिके, लॅब टेक्निशियन प्रियंका गावंडे, डाटा एन्ट्री ऑपरेटर साक्षी भागवतकर, यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री किसन जाधव यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक एम.डी खडतडे यांनी केले. सर्वांचे आभार प्रदिप पट्टेबहादूर यांनी मानले. सदर कार्यक्रमाचे आयोजन तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या कुष्ठरोग विभाग मार्फत करण्यात आले होते.

# धोत्रे खुर्द जि.प. शाळेतील ‘शेतीमाल विक्री’ उपक्रमाचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडून कौतुक; ‘मातीशी नातं’ कक्षामुळे शाळा ठरतेय ग्रामविकासाचे केंद्र

**दैनिक युवक आधार**

**आष्टी(प्रतिनिधी)/बाळासाहेब रकटाटे :** पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धोत्रे खुर्द येथे शिक्षकांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या ‘मातीशी नातं’ या नाविन्यपूर्ण उपक्रमाने शिक्षण क्षेत्रासह ग्रामविकासातही नवा आदर्श निर्माण केला आहे. या उपक्रमांतर्गत शाळेच्या परिसरात स्वतंत्र ‘मातीशी नातं’ कक्षाची स्थापना करण्यात आली असून, गावात उत्पादित होणारा शेतीमाल व कडधान्ये थेट विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.



या अभिनव उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ मिळत असून, स्थानिक व सेंद्रीय उत्पादनांना चालना मिळत आहे. शाळा केवळ शिक्षण देणारी संस्था न राहता ग्रामविकास व आत्मनिर्भरतेचे प्रभावी माध्यम ठरत असल्याचे चित्र या उपक्रमातून दिसून येत आहे.

या उपक्रमाची दखल घेत राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी शाळेतील शिक्षक सचिन ठाणगे व नंदा चेमटे यांचे विशेष कौतुक केले. “शाळा आणि गाव यांच्यातील नाते अधिक दृढ करणारा हा उपक्रम असून, तो राज्यातील इतर शाळांसाठी आदर्श ठरेल,” असे गौरवोद्गार त्यांनी काढले.


या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शेती, कडधान्य उत्पादन, विक्री प्रक्रिया तसेच आर्थिक व्यवहार यांचे प्रत्यक्ष व व्यवहार्य ज्ञान मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कृती, आत्मनिर्भरतेची भावना आणि सामाजिक जबाबदारी अधिक बळकट होत आहे.शाळेमध्ये गावात तयार होणारा सेंद्रीय भाजीपाला, गावराण कडधान्ये, ज्वारी, बाजरी, गहू, लोकर, घोंगडी आदी शेतीमाल बाजारपेठेच्या तुलनेत कमी दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे. या उपक्रमाला शेतकरी, पालक व ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

दरम्यान, “शाळेला गावाची आणि गावाला शाळेची मदत मिळत असल्याने हा उपक्रम ‘स्थानिक ते राष्ट्रीय’ या संकल्पनेला साकार करणारा असून, राज्यातील इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरेल,” असे मत अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी व्यक्त केले.एकूणच ‘मातीशी नातं’ या उपक्रमामुळे शिक्षण, शेती आणि ग्रामविकास यांचा सुंदर संगम साधला जात असून, धोत्रे खुर्दची जि. प. शाळा राज्यासाठी एक आदर्श नमुना ठरत आहे.

# येवता येथे एक फेब्रुवारीपासून रंगणार क्रिकेटचा थरार, 51 हजाराचे पहिले बक्षीस

**दैनिक युवक आधार**

**रिसोड. प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** एकता स्टेडियमवर एक फेब्रुवारीपासून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना हक्काचे व् व्यासपीठ मिळवून देण्यासाठी समस्त नागनाथ क्रिकेट क्लब च्या वतीने या स्पर्धा भरवण्यात येत असून परिसरातील क्रीडा प्रेमीमध्ये या स्पर्धेबाबत कमालीची उस्तुकता निर्माण झाली आहे, या स्पर्धेतील विजेत्या संघासाठी भव्य पारितोषिके ठेवण्यात आली आहेत, स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या



संघास 51 हजार, द्वितीय 31 हजार, तृतीय 21 हजार, चौथे 1100 हजार, पाचवे 9 हजार सहावे 5 हजार रुपयाचे रोप पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे स्थानिक स्तरावरील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे या मागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले स्पर्धेसाठी नाव नोंदणी प्रक्रियेला सुरुवात झाली असून मर्यादित संघनास प्रवेश दिला जाणार असल्याने अनेक नामांकित संघाने आपला सहभाग निश्चित केला आहे या स्पर्धेच्या यशस्वी नियोजनासाठी .. नट्टू अंभोरे, सतीश भांदुर्गे गणेश भांदुर्गे संदीप नवघरे सागर भांदुर्गे केशव भांदुर्गे यांच्यासह गावातील तरुण आणि ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत या क्रीडा महोत्सवाचा लाभ घेण्याचे आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे..

# वारकरी परंपरेचा जागतिक गौरव; सत्य कथेवर आधारित “श्री संत श्रीपाद बाबा” चित्रपटास आंतरराष्ट्रीय सन्मान

## विकास वायाळ यांना 2025 दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचा बेस्ट ॲक्टर अवॉर्ड

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** वारकरी परंपरेतील आध्यात्मिक मूल्ये, सत्यनिष्ठा, साधेपणा आणि समाजप्रबोधन यांचा प्रभावी संगम असलेल्या सत्य कथेवर आधारित “श्री संत श्रीपाद बाबा” या चित्रपटाने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा गौरव वाढवला आहे. वारकरी संत श्री संत श्रीपाद बाबा यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित या चित्रपटाला प्रतिष्ठित इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये “बेस्ट इंडिपेंडेंट अवॉर्ड” प्रदान करण्यात आला असून, ही बाब संपूर्ण वारकरी संप्रदायासह मराठी चित्रपटसृष्टीसाठी अत्यंत अभिमानास्पद ठरली आहे.

हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता सत्य, अध्यात्म, मानवता, समता आणि सामाजिक जाणीव यांचा सखोल संदेश देतो. वारकरी परंपरेतील श्रद्धा व भक्तीचा विचार जागतिक व्यासपीठावर पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण




कार्य या चित्रपटातून घडले आहे. त्यामुळे देश-विदेशातील प्रेक्षक, समीक्षक आणि चित्रपट रसिकांकडून या चित्रपटाचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.

या चित्रपटातील प्रमुख भूमिकेसाठी अभिनेता विकास वायाळ यांनी साकारलेली भूमिका प्रेक्षकांच्या मनावर खोल ठसा उमटवणारी ठरली आहे. त्यांच्या उत्कृष्ट, संयमी आणि भावस्पर्शी अभिनयाची दखल घेत 2025 दादासाहेब फाळके चित्रपट युनियन तर्फे त्यांना “बेस्ट ॲक्टर” पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा मानाचा पुरस्कार बॉलिवूड अभिनेता श्री गिरीश थापर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

विशेष म्हणजे, “श्री संत श्रीपाद बाबा” या चित्रपटाला आतापर्यंत८ नॅशनल अवॉर्ड,६ वर्ल्ड सिनेमा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल अवॉर्डआणि१३ सिंगापूर लाईन्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल अवॉर्डअसे एकूण अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. हा चित्रपट विकास वायाळ व दादासाहेब फाळके प्रोडक्शन हाऊस यांच्या अधिकृत YouTube चॅनेलवर उपलब्ध आहे. सर्व रसिकांनी हा चित्रपट आवर्जून पाहावा, लाईक करावा, शेअर करावा, चॅनेल सबस्क्राईब करावे तसेच इंस्टाग्राम, फेसबुक व व्हॉट्सॲप ग्रुपवर मोठ्या प्रमाणावर शेअर करून या प्रेरणादायी सत्य कथेचा प्रसार करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# पनवेलमध्ये लोकशाहीचा 'बाजार'? स्वीकृत नगरसेवक पदासाठी १ कोटींची बोली; रमेश गुडेकर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीचा धुराळा खाली बसतो न बसतो, तोच आता राजकीय वर्तुळात 'खोक्यांच्या' चर्चेने वादळ उठवले आहे. १५ जानेवारीला पार पडलेल्या निवडणुकीत भाजपने निर्विवाद वर्चस्व मिळवले असले, तरी विजयाच्या या गुलालानंतर आता 'स्वीकृत नगरसेवक' पदावरून शिवसेना ज्येष्ठ नेते रमेश गुडेकर यांनी खळबळ उडवून दिली आहे.

निवडणुकीत उमेदवारांनी रक्ताचे पाणी केले, पदरचे पैसे खर्च केले आणि काहींनी तर निवडणुकीसाठी चक्क कर्जाचा डोंगर अंगावर ओढून घेतला. मात्र, आता फळ मिळण्याची वेळ आली असताना "एक जागा-एक कोटी" असा व्यवहार सुरू असल्याचा गंभीर आरोप गुडेकर यांनी केला आहे. ज्यांचा पक्षाशी किंवा निवडणुकीशी दुरान्वयेही संबंध नाही, असे धनदांडगे केवळ पैशाच्या जोरावर 'नगरसेवक' होण्याचे स्वप्न पाहत असल्याचे चित्र आता समोर येत आहे. रमेश गुडेकर यांनी अत्यंत आक्रमक




शब्दांत पक्षाच्या धोरणांवर ताशेरे ओढले आहेत. त्यांच्या मते ज्यांनी पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन अटीतटीची लढत दिली, ते आज दुर्लक्षित आहेत. जर पैशावाल्यांना पदे दिली, तर सामान्य कार्यकर्त्यांचा विश्वास उडेल आणि पक्ष रसातळाला जाईल. नेत्यांनी पैशासाठी पदे विकल्यास जनमानसात चुकीचा संदेश जाऊन पक्षाचा नामोनिशान

> **"ज्यांनी प्रामाणिकपणे निवडणूक लढवली, पक्ष टिकवला, त्यांनाच संधी मिळायला हवी. अन्यथा, पक्षाची अवस्था 'असून अडचण आणि नसून खोळंबा' अशी होईल.**
> **- रमेश गुडेकर (ज्येष्ठ नेते, शिवसेना)**

मिटेल. या निवडणुकीत महाआघाडीच्या काही उमेदवारांनी अचानक माघार घेतल्याने भाजपचे ६ उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. तेव्हाही 'घोडेबाजारा'ची चर्चा रंगली होती. आता पुन्हा स्वीकृत पदासाठी १ कोटींची मागणी होत असल्याच्या आरोपाने, पनवेलमधील राजकारण हे केवळ 'अर्थकारणा'वर चालले आहे का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत. एकूण ७८ नगरसेवकांपैकी ७ जागा स्वीकृत नगरसेवकांसाठी राखीव आहेत. महायुती ५ जागा आणि महाविकास आघाडी २ जागा या २ जागांवर आता कोणाची वर्णी लागते, यावर महाविकास आघाडीचे भवितव्य अवलंबून आहे.

# दादासाहेब फाळके चित्रपट युनियन पुरस्कार सोहळ्यात डॉ. दीपक खांडेकर यांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**मुंबई | प्रतिनिधी :** दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी येथे दादासाहेब फाळके चित्रपट युनियन तर्फे चित्रपटसृष्टीतील कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी भव्य व दिमाखदार पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात ज्येष्ठ व लोकप्रिय कलाकार रोहिणी हट्टंगडी, विजय पाटकर, अरुण नलावडे यांच्यासह चिरतरुण, बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. दीपक खांडेकर यांना सन्मानपूर्वक




गौरविण्यात आले.

डॉ. दीपक खांडेकर यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी असून त्यांच्या जडणघडणीत देशभक्तीचे संस्कार खोलवर रुजलेले आहेत. स्वातंत्र्यसैनिक असलेल्या आई-वडिलांकडून मिळालेले संस्कार हेच त्यांच्या कार्यप्रवृत्तीचे अधिष्ठान ठरले. सुमारे तीस वर्षांचा समृद्ध व्यावसायिक अनुभव त्यांच्या गाठीशी असून, त्यांनी जिंदालसारख्या नामांकित औद्योगिक समूहात उच्च पदावर कार्य केले आहे.

सध्या ते बिझनेस कन्सल्टंट व एज्युकेशन कन्सल्टंट म्हणून कार्यरत असून, अध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने सक्रिय योगदान देत आहेत. विशेष म्हणजे, महाराष्ट्र पोलीस दलात तब्बल आठ वर्षे त्यांनी सेवाभावाने ॲडिशनल पोलीस ऑफिसर म्हणून कार्य करून समाजसेवेचा आदर्श घालून दिला आहे.

त्यांचा शैक्षणिक प्रवास अत्यंत व्यापक व बहुआयामी आहे. बी.कॉम, एमबीए, डॉक्टरेट इन मार्केटिंग, रशियन भाषेतील पदवी, मास कम्युनिकेशनमधील पदवी, पत्रकारिता व इलेक्ट्रॉनिक्समधील डिप्लोमा, बॅचलर इन लॉ अशा विविध अभ्यासक्रमांसह २००४ साली ‘श्री साई चरित्र’ ग्रंथावरील अडीच वर्षांचा अभ्यासक्रम त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केला. आजही शिक्षणाची ज्योत ते अखंड प्रज्वलित ठेवत आहेत.

साहित्यिक क्षेत्रातही त्यांचा ठसा ठळक आहे.आई-वडिलांच्या “तारा अरविंद” या नावाने प्रकाशित झालेला त्यांचा काव्यसंग्रह ॲमेझॉनवर उपलब्ध असून, ते एका मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षही राहिले आहेत. त्यांनी केलेले विपुल लेखन पाहता भविष्यात सात ते आठ काव्यसंग्रह प्रकाशित होतील, असा विश्वास साहित्यवर्तुळात व्यक्त केला जात आहे.

चित्रपट व मनोरंजन क्षेत्रातही डॉ. दीपक खांडेकर यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.एका वर्षात त्यांनी ४० हिंदी-मराठी मालिका तसेच १० चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या आहेत. “प्रतिशोध” आणि “उज्ज्वल निकम” हे त्यांचे चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहेत. याशिवाय ५ वेब सिरीज आणि “लग गई वाट मेरे पापाजी” हा डान्स व्हिडिओ अल्बमही प्रदर्शित झाला आहे.

जाहिरातविश्वातही त्यांचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो.पाच जाहिरातींमध्ये त्यांनी काम केले असून, मेक माय ट्रिपच्या जाहिरातीत आलिया भट्ट यांच्यासोबत काम करण्याची संधी त्यांना लाभली. विशेषतः कॅडबरी फ्युज डोलीची जाहिरात सर्व भाषांमध्ये गाजली. त्यातील “मंडप तो उधर है” हा संवाद २०० मिलियनहून अधिक व्ह्यूज मिळवून प्रचंड लोकप्रिय ठरला.अशा या बहुगुणी, सातत्याने कार्यरत, समाजभान जपणाऱ्या आणि कलाविश्वात स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या डॉ. दीपक खांडेकर यांना मिळालेला हा सन्मान म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाचीच पावती आहे.

# अभद्र "अजातशत्रु" व उद्दंड "विदुदभ" वैर, घोर षड़यंत्रक ठरले (ई.पू. ४९२-४६०)

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादक** : "अजातशत्रु" नावाचा अर्थ, ज्याचा कोणीच शत्रू नाही. या हेतू निशी मगध नरेश बिंबिसार नी आपल्या पहिल्या पुत्रा चे नाव अजातशत्रु ठेवले होते. नामकरण सोहळयात सम्राट बिंबिसार नी बुद्धाला भिक्षु संघा सहित राजगृहात आमंत्रित केले होते. बाळाला बुद्धाच्या कवटीत सोपवले, तेंव्हा बुद्ध म्हणाले, जन्म हे हि दुःखाचेच कारण असते. तेंव्हा बिंबिसार चिंतातूर झाले होते. अजातशत्रु चे दुसरे नाव कुणीक होते. त्याचे कारण, जेंव्हा माता कौशल्या देवी गर्भावस्थेत होती, तेंव्हा तिला बिंबिसार चे रक्त पिण्याची इच्छा झाली. बिंबिसार नि कट्यारी नि आपल्या हाताची कुणिका कापली व तिला रक्त पाजले होते. जेंव्हा अजातशत्रु युवा अवस्थेत आला, तेंव्हा त्याला चंपा (बंग) चा युवराज अधिकृत करून बिंबिसार ने पाठविले होते, परंतु त्याची नजर मगध सिंहासनावर होती. पित्याच्या एक-एका हलचलीवर त्याची गिद्ध दृष्टी होती. बुद्धाशी मैत्री व भिक्षु संघाला दान पुरविणे त्याच्या इच्छेच्या विरुद्ध होते.

बुद्धाचा आत्याभाऊ देवदत्ताशी अजातशत्रु चे मधुर संबंध होते. तो त्याला वर्धमान महावीरा कडे घेऊन गेला व चक्रवर्ती सम्राट होण्याची इच्छा प्रकट केली. त्याला उत्तर मिळाले, आधी जो सम्राट पदावर स्थापित आहे, त्याला निष्कासित करावे लागेल, तेंव्हा देवदत्तानी युक्ती दिली कि बिंबिसार ची हत्या करावी. परंतु हि युक्ती न वापरता अजातशत्रु नि निशुल्क आरोप लावून पिता बिंबिसार ला नजर कैद केले. बिंबिसार नि आपला कारागृह अश्या ठिकाणी असावा जेणे करून गृद्धकूट पर्वतावर विचरण करतांना बुद्धाचे दर्शन व्हावे. तशीच व्यवस्था करण्यात आली, आणि फक्त एक राणी माता कौशल्या देवी त्यांच्या सेवे करीता उपलब्ध ठेवली. मगध सिंहासनावर काबीज होताच चक्रवर्ती सम्राट बनण्याचा प्रयत्न सुरु झाला. बलिष्ठ सैन्य तैयार करून शेजार चे राज्य हडपने, निरंतर युद्ध स्थितीत राज्य होते. त्याने (रथमुसल अग्निकंटक) शस्त्र बनविले होते.

इकडे कौशल युवराज विदुदभ वयात आल्यावर आपल्या अंगरक्षकां सोबत कपिलवस्तू ला नाना, मामा गृही पोहचला. खूप स्वागत सत्कार झाला. काही दिवसा नंतर तो श्रावस्ती कडे वापस निघाला. त्याच्या एका अंगरक्षकाचे खडक (भाला) विश्राम गृहात चुकून राहिले होते. ते घेण्या करिता तो विश्राम गृहात आला. तिथे खूप साफ सफाई सुरू होती. हे बघून त्याने सफाई कर्मी लोकांना विचारले, हा काय प्रकार आहे? ते म्हणाले, इथे जो राजकुमार विराजित होता, तो दासीपुत्रीचा पुत्र आहे. लवकरात लवकर आम्हाला साफ सफाई करण्याची राजाज्ञा आहे. हे ऐकून तो अंगरक्षक अचंभित झाला. वापसी मार्गावर त्याने हे दृश्य वृत्तांत राजकुमार विदुदभ ला सांगितला. यावरून विदुदभ संतापला. वेळ आल्यावर या शाक्य लोकांना या कृत्याची सजा भोगावी लागेल. हा संकल्प त्याने मनात धरून ठेवला. पूर्वाग्रहाच्या क्रोधाग्नीत काही वर्षा नंतर वयात आल्यावर महाराजा प्रसेनजीत नि त्याला कौशल देशाचा सेनापती बनवले. संसारात सेनापती पद बनविणारा प्रथम शासक महाराजा प्रसेनजीत ला सम्मान प्राप्त आहे. सेनापती बनताच विदुदभ नि कपिलवस्तूच्या शाक्यांना युद्धा साठी आव्हान केले. आता मी त्या भूतकाळात झालेल्या अपमानाचा बदला घेईल. हा दासी पुत्रीचा पुत्र एकाहि शाक्या ला जीवंत सोडणार नाही. ह्या आव्हानाला घाबरून काही शाक्य कुटुंब मोरियकोट (पिंपळवन) इथे जाऊन मौर्य नावाने स्थापित झाले आणि काही शाक्य कुटुंब महारवाकोट (पातालपुरी) सिंध हैदराबाद (पाकिस्तान) इथे जाऊन नागलोकात स्थापित झाले होते.

तिकडे मगध नरेश नजर कैद व अजातशत्रुचा विस्तारवादी युद्ध उपक्रम, हे बघून कोसल नरेश प्रसेनजीत खिन्न झाले व कौशल्यादेवी ला उपहार दिलेले काशी क्षेत्र मगध पासून वापस घेतले. यावरून दोन्ही राज्यात निरंतर युद्ध संग्राम आरंभ झाला. कौशल युवराज विदुदभ हि आपल्या सैन्य शक्तीने सज्ज होता. या आधी त्याने कपिलवस्तू नगर उध्वस्त करून शाक्य लोकांना अस्त-व्यस्त केले होते. याचा त्याच्यावर विपरीत परिणाम झाला होता. अजातशत्रु हि विदुदभ ला स्वतः पेक्षा निम्न जन्म उत्पत्ती जनक समजत होता, कारण विदुदभ ची माता "वासमखत्तीया" नागमुंडा व महानाम शाक्याची पुत्री होती. पुत्राच्या हिंसक कृत्या मुळे प्रसेनजीत खिन्न राहत असे. तिन्ही राज्यातील मैत्री रिश्ते संकटात आले होते. युद्ध संग्रामात प्रसेनजीत व त्यांची निशस्त्र कोसल सेना अजातशत्रु पुढे नतमस्तक झाली. काही सैन्यबल घेऊन विदुदभ चेदी राजाच्या सुरक्षेत चेटक कडे आला होता. या अवस्थेत असहाय प्रसेनजीत राजगृह (मगध) ला येऊन बहीण कौशल्यादेवी शी भेट घेण्यास निघाला आणि संध्याकाळी राजगृहाचे सर्व द्वार बंद झाले होते. तो बाहेरच थांबला. त्या रात्रीच्या खूब थंडी मुळे त्याने प्राण सोडला. दुसऱ्या दिवशी राजकीय थाटात अजातशत्रु नि आपल्या मामाचा अंतिम संस्कार केला. चेटक राजा वर अजातशत्रुचा पूर्वागृह कोप होता, कारण तिथे राणी चेल्लना (सौतेली माता), पुत्र हल्ला, बेहल्ल सोबत माहेरी स्थानिक झाली होती. तिला बिंबिसार नि पांच हत्ती काही द्रव्य व तिहेरी मोतीमाला दिली होती. अजातशत्रु ते द्रव्य चेटक राजा पासून मांग करीत होता. चेदी राज्यावर दबाव येत होता कि त्यांनी विदुदभ ला मगधच्या स्वाधीन करावे. अश्या परिस्थितीत चेतक नि शेजार चे ३६ राजांना एकत्रित करून शक्तिशाली सेना तैयार केली. तेंव्हा अजातशत्रु नि कूटनीतीचा वापर केला. आमात्य "वर्षाकार" ला खोटी बनावटी हद्द पार ची सजा दिली. तो मगध क्षेत्रातून बाहेर पडला व चेटक राजा शी जाऊन भेटला. त्याचा विश्वासपात्र बनून ३६ राज संघात फूट पाडण्यात सफल झाला. अशा वेळी अजातशत्रु नि चेटक (चेदी) राज्यावर भयानक हमला केला. त्याच्या सैन्यात "रथ मुसल अग्निकंटक" अस्त्र होते. सर्व ३६ राज कुलांचा युद्ध संग्रामात पराभव झाला आणि ते दक्षिणच्या जंगली प्रदेशात जाऊन स्थानिक झाले. आज पर्यंत बिहार मधे एक जनश्रुती प्रचलित आहे, "इथून ३६ चमार कुल दक्षिणेकडे पलायित झाले होते". तेच आज चे छत्तीसगढ राज्य होय (जन. कनिंघम संदर्भ). छत्तीसगढचा सतनामी समाज त्यांचा पूर्वीचा सैनिक घटक होय. तिथे दक्षिण कौशल उपराज "सुरा"च्या सानिध्यात येऊन "विदुदभ" सुरक्षित झाला होता.

पुढे बिंबिसार चे मित्र अवंती (उज्जैन) नरेश "चंद्र प्रद्योत" वर अजातशत्रु नि आक्रमण केले. युद्ध सुरु असतांनाच अश्वरोही खबर घेऊन येतो. युवराज ला पुत्र रत्न प्राप्त झाले, तेंव्हा तो हर्ष उल्लासात युद्ध थांबवून अवंती (उज्जैन) नगराला त्याची सेना चौकस घेराबंद करून तो मगध राजगृहा कडे अति गतीने येतो व माता कौशल्येला बिलगतो, विचारतो, माझा जन्म झाला तेंव्हा माझे पिता हि असेच हर्षोल्लासी झाले होते का? माता उत्तर देते, अरे एकदा तुझा कुणिकेत खांडुक झाले होते, त्यामुळे तू किती तडपत, रडत होता. तेंव्हा बिंबिसार नि तुला दुःखाचा आभास न होता पूर्ण कुणिका तोंडात घेऊन त्यातले सगळे रंज गिळकुन घेतले होते. हे ऐकताच तो खूब पश्चाताप करत स्वतःच्या हातात लोखंडी हाथोडा घेऊन बिंबिसारच्या कारागृहा कडे निघाला. स्वतःच्या हातानी पित्याच्या हाता-पायाच्या बेड्या तोडण्याचा संकल्प होता. बिंबिसार नि त्याला स्वतः कडे येता बघून मृत्यु ला घाबरत हृदयघाता मुळे प्राण सोडला. या घटने मुळे अजातशत्रु चे हृदय हादरून गेले. त्याला स्वतःचा मूर्खपना व दुर्बुद्धी व देवदत्ताचे बुद्धा विरुद्ध कुटील षडयंत्र समझले.

**संदर्भ: १) महावंश २) बुद्ध आणि त्याचा धम्म - डॉ. बी.आर. आंबेडकर ३) महापदम नंद - शिव कुमार राजौरिया**

# पुसद येथे राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम संपन्न

## युवकांनी तंबाखू सेवनापासून लांब राहावे - डॉ नामदेव सरकुंडे यांचे आव्हान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी / राजु गायकवाड (मोहदरी)** : पंचायत समिती पुसद येथील सभागृहात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डॉ. मनाली जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यवतमाळ यांनी तंबाखूचे दुष्परिणाम शरीराच्या वेगवेगळ्या भागावर कसे होतात याबाबत माहिती दिली तसेच तंबाखू मुक्ती कायद्यासंदर्भात माहिती दिली शाळेतील विद्यार्थ्यांना सोबत घेऊन आलेले मुख्याध्यापक वर्गशिक्षक यांनी तंबाखू व तंबाखूजन्य




पदार्थ पासून दूर कसे ठेवता येईल यावर मार्गदर्शन केले. शासकीय कार्यालय निमशासकीय कार्यालय शाळा सार्वजनिक ठिकाणी सिगारेट तंबाखू खरा याबाबत बॅनर पोस्टर लावण्या संदर्भात चर्चा केली, तंबाखू जन्य पदार्थ तयार करणाऱ्या कंपन्या आता वेगवेगळ्या माध्यमातून प्रसार करीत आहेत पण त्यामध्ये तंबाखूचे नाव नसते तसेच डॉक्टर अरुण राठोड सर यांनी सुद्धा तंबाखूचे सेवन करणाऱ्या व त्यांच्याकडे रुग्ण म्हणून येणाऱ्या त्यांना चांगल्या पद्धतीने समुपदेशन करून या व्यसनापासून दूर राहण्यासाठी चांगले कार्य केलेले आहे तसेच जे त्यांच्या कडे तपासणी करण्यासाठी आलेला रुग्णांना तंबाखूजन्य पदार्थ बाबत समुपदेशन करतात व व्यसनापासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन करतात मा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुभाष ढोले साहेब, डॉ.सुखदेव राठोड साहेब जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ आणि मा. तालुका आरोग्य अधिकारी डॉ नामदेव सरकुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी अध्यक्षस्थानी मा.नायब तहसीलदार श्रीमती चंपाताई राठोड मॅडम, डॉ. अरुण राठोड दंत चिकित्सक उपजिल्हा रुग्णालय पुसद, श्री संतोष डाखोरे विस्तार अधिकारी (पंचायत ) प. स. पुसद, उपस्थित होते. उपस्थित होते.



**लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य व सोमेश्वर महादेव मंदिर फाउंडेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने लोकरत्न पुरस्कार-२०२६ वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी ३५ वर्षापासुन ग्रंथालय क्षेत्रात कार्य करणारे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक डॉ. राजेंद्र सानप यांना त्यांच्या कार्याबद्दल पुरस्कार देवून सन्मानित करताना वाहतूक पोलीस उप निरीक्षक विजयकुमार जाधवर, नवनिर्वाचित नगरसेवक ॲड.गोविंदराव शिराळे, लोकशाही पत्रकार संघाचे अध्यक्ष भागवत वैद्य, पत्रकार आत्माराम वाव्हळ, पत्रकार संघाच्या सुनंदाताई केदार, मीराताई डावकर, बाजीराव ढाकणे, संजय कुलकर्णी यांच्या सह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

# स्व. अजितदादा पवार यांना विंचूर येथे भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य स्व. अजितदादा पवार यांचे काल दि. 28 जानेवारी 2026 रोजी विमान अपघातात दुःखद निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे महाराष्ट्र राज्यासह रयत शिक्षण संस्थेवर शोककळा पसरली आहे.

स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आज दि. 29 जानेवारी 2026 रोजी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, विंचूर येथे शोकसभा आयोजित करण्यात आली होती.

या शोकसभेत डॉ. सुजित गुंजाळ , सौ. सुवर्णा जगताप , श्री. अंबादास बनकर , डॉ. श्रीकांत आवारे , किशोर पाटील , विलास गोरे , कैलास सोनवणे , शिवा सुरासे, ज्ञानेश्वर तासकर , चव्हाणके त्र्यंबक आबाजी , ठाकरे जे. एन., गायकवाड डी. आर., आर. के. चांदे, तसेच प्राचार्य देवढे एन. ई. यांनी मनोगत व्यक्त करून स्व. अजितदादा पवार



यांना श्रद्धांजली अर्पण केली.

या शोकसभेस डॉ. काकासाहेब तासकर, एकनाथ लक्ष्मण शिंदे, पंढरीनाथ दरेकर, राजु गोरे, सोमनाथ निकम, नाना गाडे, किशोर जेऊघाले, प्रमोद धंद्रे, सुवर्णा विलास गोरे, स्वाती धात्रक, सोनाली कापडणीस, आनंदी दरेकर, स्नेहा साळी, मुकुंद गायकवाड , संपत रोटे, अशोक गायकवाड , शमशुद्दीन कादरी , सुनिल क्षिरसागर, अभय पाटील, तसेच प्राचार्य कापडणीस बी. आर., प्राचार्य चव्हाण ए. डी.,उपप्राचार्य वाबळे एस. एम., पर्यवेक्षक माळी एस. टी., पर्यवेक्षक भवर बी. एफ. यांच्यासह विंचूर, रुई, वनसगाव, टाकळी विंचूर व चांदोरी येथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ व विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्याच्या इतिहासात पती पत्नी उपमुख्यमंत्रीपद होण्याचा मान अजितदादा व सुनेत्रा पवार यांना

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( नासिकेत पानसरे )** : शनिवारी राज्याच्या इतिहासात महिला उपमुख्यमंत्री होण्याचा मान सुनेत्रा पवार यांना मिळाला आहे.याच बरोबर पती पत्नी उपमुख्यमंत्री होण्याचा मान देखील या दांपत्याला मिळाला आहे.अजितदादा पवार यांनी सहा वेळा राज्याचे उपमुख्यमंत्रीपद भूषविले आहे. परंतू त्यांचे मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न अखेर स्वप्नच राहिले.बुधवारी दि.२८



जानेवारी २०२६ रोजी पहाटे बारामतीत विमान अपघातात अजितदादासह पाच जणांचा मृत्यू झाला.त्यानंतर राजकारणाची चक्रे फिरली.अजितदादा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. त्याचबरोबर उपमुख्यमंत्री होते. त्यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांच्याकडे दोन्ही पदे देण्यात आली आहेत.

# महामार्ग प्राधिकरणाच्या उदासीन धोरणामुळे घेतला पुन्हा दोन युवकांचा बळी

## ( रेती वाहतुक करणाऱ्या टिप्परची दुचाकीला धडक एकाचा जागीच मृत्यु , तर एकाचा उपचारासाठी जात असताना वाटेत मृत्यू.)

**दैनिक युवक आधार**

**एम.डी.सुरोशे/महागाव** : बायपासचे काम पुर्ण न झाल्याने अरुंद रस्त्यावरून जीवघेणी वाहतुक सुरू असुन त्यामुळे तीन दिवसात तीन बळी गेले आहे. रेती वाहतुक करणाऱ्या भरधाव टिप्परने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकी टिप्पर मध्ये घुसल्याने एका युवकाचा जागीच मृत्यू झाला तर एक युवक गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी नेत असताना वाटेतच मृत्यु झाल्याची घटना आज शनिवार(३१जानेवारी) रोजी दुपारी एक वाजताच्या दरम्यान हिवरा संगम येथे घडली असुन या ठिकाणी अपघाताची मालिका सुरूच असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महागाव तालुक्यातील अंबोडा येथील देवानंद दोडके(वय१९वर्षे) व त्याचा मित्र शुभम पाटे(वय१८वर्षे) हे दोघे आपल्या पल्सर दुचाकीने (क्र. एम एच२९ सीएफ८७९९) माहुर कडे जात असताना हिवरा (संगम) येथील अरूंद असलेल्या डांबरी रस्त्यावरून समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या रेती वाहतुक करणाऱ्या टिप्पर क्र. एम एच.४०बी. एल९५४४ ने दुचाकीला धडक दिली यात दुचाकी टिप्पर मध्ये घुसुन मागील बाजुस अडकली त्यामुळे टिप्पर पलटी होऊन घासत जाऊन रस्त्यालगत असलेल्या नालीत गेला.यात दुचाकीवरील देवानंद हा टायर खाली अडकुन चेंदामेंदा झाला तर शुभम हा गंभीर जखमी झाला.



तर दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला हा अपघात घडल्याबरोबर बाजुला असलेल्या दुकानातील आशिष हातमोडे,संदीप बुळे व इतर युवकांनी धाव घेत टिपरच्या समोरील भागात अडकलेल्या जखमी शुभमला बाहेर काढून त्याला उपचारासाठी माहुर येथील शासकीय रुग्णालयात हलविले परंतु शुभम ची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले होते परंतु यवतमाळ पोहोचण्यापूर्वीच त्याचा वाटेतच मृत्यू झाल्याची माहिती आहे. या अपघातामुळे काही काळ वाहतूक खोळंबली होती या अपघाताची माहिती मिळताच ठाणेदार धनराज निळे, बिट जमादार विनोद जाधव,सुनील राठोड,विवेक पारडकर,महामार्ग पोलिस मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक किशोर गवई,जमादार सुभाष नागदिवे व कर्मचाऱ्यांनी यांनी घटनास्थळी धाव घेत वाहतुक सुरळीत केली.तसेच

**नागपूर-तुळजापूर महामार्गाचे चौपदरीकरण झाले तरी हिवरा (संगम) येथील अपूर्ण बायपास आज 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. एकविरा देवीच्या बोर्डाजवळ होणारे अपघात प्रशासकीय निर्लज्जपणाचा पुरावा आहेत. जेव्हा स्थानिक नेते आणि प्रशासन सोयीस्कर मौन पाळतात, तेव्हा रस्ते विकासाचे नाही तर विनाशाचे महामार्ग वाटू लागतात. "स्वतःच्या जबाबदारीवर वाहन चालवा" असे म्हणण्याची वेळ येणे ही व्यवस्थेची हार आहे. आणखी किती बळी गेल्यावर महामार्ग प्राधिकरणाला जाग येईल? हा अधुरा बायपास म्हणजे जनतेच्या जिवाशी चाललेला खेळ आहे, जो तातडीने थांबणे गरजेचे आहे.**

**– हरीश कामारकर**

**( सामाजिक कार्यकर्ते – हिवरा (संगम) )**

घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी सवना येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविला.

हिवरा (संगम) येथे महामार्गावर बायपास प्रस्तावित आहे. परंतु महामार्ग प्राधिकरणाच्या उदासीन धोरणामुळे बायपासचे काम अद्याप सुरू झाले नाही.त्यामुळे वाहतूक गावातील अरुंद रस्त्याने होत असल्याने वाढत्या वाहतुकीमुळे वारंवार अपघात घडत आहे. नुकताच गुरुवारी अपघात घडून त्यात एक युवकाचा बळी गेला आहे.त्यामुळे बायपासचे काम सुरू करण्यासाठी अजुन किती जणांचे बळी महामार्ग प्राधिकरण घेणार असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

**ठाणेदारांच्या मध्यस्थीने आंदोलन टळले**

बायपासचे काम अद्याप करण्यात न आल्याने गावातील रस्त्याची डागडूजी करून डांबरीकरणाचे काम करण्यात आले.त्यावर गतिरोधक निर्माण करण्यात यावे अशी मागणी गावकऱ्यांनी केली होती.परंतु महामार्ग प्राधिकरणाने वेळ मारून नेत ना बायपास चे काम सुरू केले ना गावातील रस्त्यावर गतिरोधक केले. त्यामुळे गावातून अनेक वाहने भरधाव वेगाने मार्गक्रमण करीत आहेत. त्यामुळे अपघात सुरूच आहेत.यामुळे संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी आक्रमक पावित्रा घेत आंदोलन करण्याच्या तयारीत असतांनाच ठाणेदार धनराज निळे यांनी संतप्त गावकऱ्यांना शांततेचे आवाहन करून महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधुन गावकऱ्यांच्या भावना त्यांच्यासमोर मांडून याठिकाणी गतिरोधक निर्माण करण्याचे सुचविले. त्यावरून महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी येत्या चार दिवसात गतिरोधक निर्माण केल्या जाईल असे आश्वासन दिल्याने गावकऱ्यांनी बुधवार पर्यंत प्रतिक्षा करण्यात येवुन गतिरोधक करण्यात आले नाही तर गुरुवार पासून उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा ईशारा दिला.

# भारत-जगभरातील दिग्गज डॉक्टर्स, रुग्ण सुरक्षा तज्ज्ञ, आरोग्य धोरणकर्ते एकाच व्यासपीठावर आले

## 'इंटरनॅशनल हेल्थ डायलॉग २०२६' रुग्ण सुरक्षेसाठी जागतिक परिषद

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर :** 'इंटरनॅशनल हेल्थ डायलॉग (आयएचडी) २०२६' ला हैदराबादमध्ये सुरुवात झाली. या परिषदेनिमित्त भारत आणि जगभरातील दिग्गज डॉक्टर्स, रुग्ण सुरक्षा तज्ज्ञ, प्रमाणीकरण क्षेत्रातील जाणकार आणि आरोग्य धोरणकर्ते एकाच व्यासपीठावर आले आहेत. 'ग्लोबल वॉइसेस, वन व्हिजन' या संकल्पनेवर आधारित पहिल्या दिवसाचे सत्र प्रामुख्याने ' रुग्णांची सुरक्षा' या विषयावर केंद्रित होते. यामध्ये रुग्ण सुरक्षेला केवळ तांत्रिक विषय न मानता, ते नेतृत्व आणि सुशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे अधोरेखित करण्यात आले. समान आरोग्य सेवा आणि जबाबदार डिजिटल परिवर्तनाच्या माध्यमातून हे उद्दिष्ट साध्य करण्यावर चर्चा झाली. या सत्रांमधून एक महत्त्वाची बाब समोर आली: मोठ्या स्तरावर आरोग्य सेवा पुरवताना भारताने मिळवलेला अनुभव आणि मानकांमध्ये केलेली सातत्यपूर्ण सुधारणा, आता रुग्ण सुरक्षेबाबतच्या जागतिक विचारांना नवी दिशा देत आहे. डॉ.संगीता रेड्डी या व्यासपीठाची वाढती जागतिक व्याप्ती अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, IHD 2026 साठी जगभरातील ७५ हून अधिक संस्थांकडून ५,००० पेक्षा जास्त नोंदणी, ३०० हून अधिक शोधनिबंध आणि पुरस्कारांसाठी प्रवेशिका १२० हून अधिक प्राप्त झाल्या आहेत.

विविध सत्रांमधून एक महत्त्वाचा विचार सातत्याने मांडला गेला, तो म्हणजे केवळ आजार झाल्यावर उपचार करण्याऐवजी, आजार होऊ नये म्हणून वेळीच प्रतिबंधात्मक उपाय करण्यावर भर देणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर आरोग्य यंत्रणांवर येणाऱ्या दबावाबाबत बोलताना डॉ.संगीता रेड्डी यांनी नमूद केले की, "आरोग्य सेवांची मागणी झपाट्याने वाढत आहे. आपण वेगाने वाढणाऱ्या या गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण जुन्या किंवा साध्या पद्धतींनी करू शकत नाही." या चर्चेत असा निष्कर्ष काढण्यात आला की, यासाठी आपल्याला अधिक प्रभावी प्रतिबंधात्मक धोरणे, उपचारांच्या परिणामांचे अचूक मोजमाप आणि शिस्तबद्ध पद्धतीने राबवलेली डिजिटल साधने यांची सांगड घालणे आवश्यक आहे.

डॉ.कार्सन एंजेल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जागतिक गुणवत्ता आणि सुरक्षा दृष्टिकोनातून, 'इंटरनॅशनल सोसायटी फॉर क्वालिटी इन हेल्थ केअर' (ISQua) म्हणाले," रुग्णांची सुरक्षा हा विषय अनेक दशकांपासून चर्चेत आहे, पण आपण अद्याप अपेक्षित ध्येयापर्यंत पोहोचलेलो नाही, हे मान्य करावे लागेल. परिणामशून्य उपक्रम राबवण्याबाबत सावध करताना



ते म्हणाले, "आपण केवळ सुरक्षेच्या नावाखाली प्रक्रिया आणि उपक्रमांचा अनावश्यक ढिगारा साचवण्याचा धोका निर्माण करत आहोत, ज्यामुळे प्रत्यक्ष सुरक्षिततेत कोणतीही सुधारणा होत नाही. त्यांनी नेत्यांना लोकांचे वर्तन आणि परिस्थिती समजून घेण्याचे आवाहन केले: "लोकांनी जे करायला हवे होते ते त्यांनी का केले नाही, हे विचारू नका. त्याऐवजी, त्यांनी जे केले ते त्यांना त्या परिस्थितीत योग्य का वाटले, याचा शोध घ्या."

डॉ.अतुल मोहन कोचर, मुख्य कार्यकारी अधिकारी नॅशनल अक्रॅडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अँड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (NABH) म्हणाले,"रुग्णांची सुरक्षा हा केवळ तांत्रिक विषय नाही; ती एक नैतिक, सामाजिक आणि आर्थिक गरज आहे. केवळ धोरणे आखल्याने सुरक्षिततेत सुधारणा होत नाही, तर त्या धोरणांची कार्यक्षम अंमलबजावणीच बदल घडवून आणते."

रुग्णांच्या सुरक्षेबद्दलचे आपले ध्येय स्पष्ट करताना ते पुढे म्हणाले, "रुग्ण सुरक्षेच्या बाबतीत आपण महत्त्वाकांक्षी असायला हवे. रुग्णांच्या सुरक्षेचा विचार करताना 'झिरो हार्म' (शून्य हानी) हा एकमेव आकडा आपण स्वीकारला पाहिजे."

---

# बोर्ली पंचतन गणातून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार सुकुमार तोंडलेकर यांची प्रचारात आघाडी

## ‘जनसेवा हीच ईश्वरसेवा’ मंत्र घेऊन पुन्हा मैदानात- सुकुमार तोंडलेकर

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन: संतोष रेळेकर :** आगामी पंचायत समिती निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी पार पडणार असून ९ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन पंचायत समिती अंतर्गत बोर्ली पंचतन गणातून शिवसेना (शिंदे गट) कडून सुकुमार तोंडलेकर यांनी आपली उमेदवारी जाहीर करत निवडणुकीच्या रिंगणात जोरदार एन्ट्री घेतली आहे.

सुकुमार तोंडलेकर यांनी यापूर्वी श्रीवर्धन पंचायत समितीचे सभापती म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली असून, प्रशासनावर पकड, विकासाभिमुख दृष्टीकोन आणि लोकांच्या प्रश्नांची तळमळ ही त्यांची ओळख आहे. दांडगा जनसंपर्क, राजकारणाचा उत्तम व्यासंग आणि गोरगरिबांच्या हाकेला धावून जाणारा लोकप्रतिनिधी म्हणून पंचक्रोशीत त्यांची विशेष ओळख निर्माण झाली आहे. तसेच ते कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांचे विश्वासू सहकारी म्हणूनही परिचित आहेत. नुकताच त्यांच्या प्रचाराचा नारळ फुटला असून प्रचाराच्या पहिल्याच टप्प्यात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. प्रचारादरम्यान तोंडलेकर हे दारोदारी जाऊन थेट नागरिकांशी संवाद साधत असून, विकासकामांबरोबरच वैयक्तिक प्रश्न समजून घेण्यावर भर देत आहेत. याप्रसंगी सुकुमार तोडलेकर यांच्या समवेत माजी जिल्हा परिषद सदस्य श्यामकांत भोकरे, भंडारी समाजाचे ज्येष्ठ सदस्य मनोहर परकर, बाबु परकर, प्रशांत नांदविडकर, प्रफुल्ल नांदविडकर, राकेश शिरवटकर यांच्यासह कार्यकर्ते, समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचार माध्यमांशी संवाद साधताना सुकुमार तोंडलेकर म्हणाले, “स्थानिकांचे मुलभूत प्रश्न मार्गी लावण्यासाठीच मी ही निवडणूक लढवत आहे. प्रामाणिकपणे जनतेची सेवा करण्यासाठी मी या निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहे. ही स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असल्याने निवडणुकीपूर्वी केलेली कामे, लोकांची सेवा आणि जनतेचा विश्वास याच



आधारावर मला उमेदवारी मिळाली आहे. जनभावनेनुसारच मला स्वीकारले आहे, त्यामुळे कोणतेही आव्हान मी आव्हान म्हणून न पाहता जबाबदारी म्हणून स्वीकारतो." ते पुढे म्हणाले की, “निवडणूक असो वा नसो, प्रशासकीय स्तरावर तसेच वैयक्तिक आयुष्यात लोकांची अनेक कामे मी केली आहेत, हे जनतेला ठाऊक आहे. ‘जनसेवा हीच ईश्वरसेवा’ या तत्त्वानुसार माझी वाटचाल सुरू असून त्यामुळेच मला मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त आहे.”

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शामकांत भोकरे यांनीही आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, “राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्ह्यात जरी मोठ्या प्रमाणावर विस्तारित झालेला असला, तरी या निवडणुकीत अनेक निष्ठावंत आणि दिग्गजांना तिकीट नाकारण्यात आले आहे. त्यामुळे पक्षांतर्गत नाराजीचा आम्हाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदा होईल. विकासकामांसोबतच लोकांची वैयक्तिक कामे करणे हे तितकेच महत्त्वाचे असते आणि त्यातूनच मतांच्या रूपाने आशीर्वाद मिळतो.” भोकरे यांनी पुढे विश्वास व्यक्त करत सांगितले की, “सुकुमार तोंडलेकर हे अहोरात्र जनसामान्यांची सेवा करतात. त्यामुळे ते या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा मला आणि सर्व कार्यकर्त्यांना ठाम विश्वास आहे.” एकंदरीतच बोर्ली पंचतन गणात निवडणूक रंगतदार होण्याची चिन्हे असून, सुकुमार तोंडलेकर यांचा अनुभव, कामाचा लेखाजोखा आणि जनतेशी असलेला थेट संपर्क यामुळे त्यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे चित्र आहे.

---

# दारू पाजण्यास विरोध केला म्हणून केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** दारू पाजण्यास विरोध केला असता दोघाजणांनी बत्तीस वर्षीय तरुणाला मारहाण केली. या प्रकरणी 28 जानेवारी रोजी तळोजा पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. जन्मेष शर्मा हे खारघर येथे राहत असून ते कुणाल वाईन तळोजा फेस टू येथे दारू घेण्यासाठी गेले. त्यावेळी त्याच्या बाजूला एक मुलगा आला आणि दारू पाजशील का असे बोलला आणि जन्मेषच्या हातातली पिशवी खेचू लागला. यावेळी आणखी एक इसम त्या ठिकाणी आला आणि दारूची पिशवी ओढू लागला त्याला विरोध केला असता हाताने मारहाण केली आणि तोंडावर जोराची बुक्की मारली तसेच लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी बियरची बाटली डोक्यात मारल्याने जन्मेष जखमी झाला आणि त्यानंतर ते दोघे पळून गेले. यावेळी मारहाणीत सोन्याचे ब्रेसलेट दिसून आले नाही.

---

# पनवेल शहर पोलिसांच्या तत्परतेमुळे अपघात टळले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल शहर पोलिसांच्या तत्परतेमुळे आज सकाळी वाहनांना होणारे अपघात टळल्याची घटना पनवेल जवळील गव्हाण फाटा येथे घडली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज तळोजा येथे एका कार्यक्रमानिमित्त येणार असल्याने ते जाणाऱ्या मार्गावर पोलीस बंदोबस्त ठिकठिकाणी लावण्यात आला होता. पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गव्हाण फाटा येथील वपोनि नितीन ठाकरे, गोपनीय विभागाचे मनोज पाटील, पोल्स हवालदार माधव शेवाळे, चालक समाधान पाटील, हे कर्तव्यावर असताना एका मच्छी वाहून नेणाऱ्या टेम्पो मधून मोठ्या प्रमाणात थर्माकोलचे



बॉक्स हे भर रस्त्यात पडले यावेळी मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ सुरु होती. हा प्रकार वपोनि नितीन ठाकरे यांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने त्यांच्या सोबत असलेल्या पथकाच्या साहाय्याने महामार्गावर धाव घेऊन रस्त्यावर पडलेले थर्माकोलचे मोठे बॉक्स त्वरित बाजूला केले. त्यामुळे होणारे अपघात टळले आहे. पोलिसांच्या तत्परतेबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

---

# अनोळखी इसमाचा मृतदेह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** एका अनोळखी इसमाचा मृतदेह पनवेल शहर परिसरात आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर करीत आहेत. सदर अनोळखी इसमाचे अंदाजे वय - ४५ ते ५० वर्षे, रंग सावळा, उंची अंदाजे ५ फुट, ५ इंच, चेहरा उभट, अंगाने मध्यम, डोक्याचे केस काळे, दाढी वाढलेली मिशीचे केस काळे वाढलेले, अंगात नेसुन मळकट चॉकलेटी रंगाचा फुलबाहयाचा शर्ट,



निळया रंगाची मळकट जिन्स पॅन्ट अशा वर्णनाचा पुरूष इसम आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उप निरीक्षक अनंत परांगे यांच्याशी संपर्क साधावा.

---

# ओवळे गावात अदानी फाउंडेशनतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर; ११२ लाभार्थ्यांनी घेतला लाभ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** ओवळे गावात आज दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी अदानी फाउंडेशनच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये सर्व वयोगटातील नागरिकांची तपासणी करण्यात आली. विशेषतः वयोवृद्ध नागरिकांची शुगर व बीपी तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले. तपासणीनंतर सर्व लाभार्थ्यांना मोफत औषधे वितरित करण्यात आली.

या शिबिरामध्ये डॉ. अमित व डॉ. कुणाल यांनी लाभार्थ्यांची सखोल तपासणी




केली. शिबिराचे संपूर्ण नियोजन व अंमलबजावणी अदानी फाउंडेशनच्या वतीने सौ. अश्विनी म्हात्रे यांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंगणवाडी सेविका सौ. सुविधा पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.यावेळी अदानी फाउंडेशनकडून सुवर्णा शेटे, निवेदिता, दिपाली पाटील, सुरेखा घरत व आशा ठाकूर उपस्थित होत्या. या आरोग्य तपासणी शिबिराचा एकूण ११२ लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून त्यामध्ये ८९ महिला व २३ पुरुष सहभागी होते. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेले हे शिबिर समाजोपयोगी ठरले असून स्थानिक नागरिकांनी अदानी फाउंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

---

# पोलीस ठाण्यात केस का केली म्हणून चाकूने केली मारहाण

**नवीन पनवेल :** पोलीस ठाण्यात केस का केली याचा राग मनात धरून पाठीवर, दोन्ही हाताला आणि तोंडावर चाकूने वार केल्याप्रकरणी आरोपी ऋषिकेश गणेश घाडगे यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 26 जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

महादेव तळेकर हे नावडे फेस वन येथे राहत असून त्यांच्या ओळखीचा ऋषिकेश घाडगे हा सोसायटीमध्ये आला आणि माझ्याविरुद्ध केस का केली

या गोष्टीचा राग मनात धरून त्यांच्या पाठीवर दोन्ही हाताला आणि तोंडावर चाकूने वार केले. हे भांडण सोडवण्यासाठी सोसायटीतील वॉचमेन राजेश खडका आला असता त्याला देखील चाकूने मारहाण केली.

---

# लिंबा सर्कलमधील प्रश्न प्राधान्याने सोडवू , दत्तात्रय मायंदळे यांचा प्रत्यक्ष गाठीभेटीवर भर

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी तालुक्यातील लिंबा सर्कलमधील रस्ते पाणीपुरवठा वीज आरोग्य शिक्षण देवस्थानचा जिर्णोद्धार या प्रलंबित असलेल्या प्रश्नांना प्राधान्य देऊन लिंबा जिल्हा परिषद पंचायत समितीच्या माध्यमातून ही कामे मार्गी लावु अशी ग्वाही कॉग्रेसचे उमेदवार दत्तात्रय मायंदळे यांनी व्यक्त केले तसेच मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटीवर भर देवून मतदारांशी संवाद साधला प्रचारादरम्यान मतदारांचा वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसत



आहे आपण कॉग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष मा आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्या आदेशाने निवडणूक लढवत असल्याचे सांगितले लिंबा सर्कलमधील अनेक वर्षांपासूनचा विकास रखडला असल्याचे चित्र दिसून आल्याने मला येथे राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने उमेदवारी जाहीर केली आणि आज या सर्कलमधील सर्वाच रस्त्यांचा मोठा प्रश्न आहे आपण साथ दिल्यास आगामी काळात लिंबा सर्कल पक्क्या रस्त्यांनी जोडू गोदावरी किनारा असलेल्या गावांमध्ये भौतिक समस्या प्रलंबित अनेक आहेत देवस्थानचा जिर्णोद्धार करू या सह अधिक प्रश्ननांना प्राधान्य देऊ असे यावेळी लिंबा जिल्हा परिषद सर्कलचे कॉंग्रेसचे उमेदवार दत्तात्रय मायंदळे यांनी मतदारांशी संवाद साधत आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले .

---

# प्रजासत्ताक दिनानिमित्त लालबहादूर शास्त्री हायस्कूल उस्वद येथे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते

**दैनिक युवक आधार**

**राजू शिंदे/महाराष्ट्र उपसंपादक :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी लालबहादूर शास्त्री हायस्कूल उस्वद येथे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री. ढवळे ए. एस.सर, प्रमुख पाहुणे माजी



मुख्याध्यापक श्री.खरात ए. जी. सर हे होते. गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जाधव सर यांनी केले. लेझीम, दांडिया नृत्य व विविध कलाविष्काराने मुलांनी प्रेक्षकांची मने जिंकली. श्री. कादे सर,श्री. शिराळ सर, श्री. ढाकणे सर श्री. इक्कर सर, श्री. शेजुळ सर श्री. खवणे सर,श्री. जमधाडे सर श्री. बनसोड सर,श्री.नवघरे सर श्री. चव्हाण सर,श्री. जोशी सर, श्री. खंदारे मामा श्री. सिद्धेश्वर सरोदे श्री. सोपान सरोदे यांच्या सर्वांच्या सहकार्याने सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# गोल्ला गोल्लेवार यादव समाज सेवा संघटनेचा नांदेड जिल्हास्तरीय भव्य मेळावा उत्साहात संपन्न

## मेळाव्या साठी जिल्हाभरातुन अडीच ते तीन हजार समाज बांधवांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/नांदेड :** दिनांक 24 जानेवारी 2026 रोजी आर्य वैश्य (वासवी माता) मंगल कार्यालय सिडको नांदेड येथे गोल्ला गोल्लेवार यादव समाज सेवा संघटना नांदेड च्या वतीने जिल्हास्तरीय भव्य दिव्य मेळावा आयोजित करण्यात आला होता, सदरील मेळाव्याचे उद्घाटक म्हणून भोकर विधानसभेचे लोकप्रिय आमदार मा श्री ॲड श्रीजयाताई अशोकराव चव्हाण मॅडम होते, तर प्रमुख अतिथी म्हणून गोल्ला गोल्लेवार यादव समाज सेवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा ओबीसी नेते,अखिल भारतीय यादव महासभेचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष मा श्री नामदेवराव आयलवाड साहेब,

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक तथा बांधकाम सभापती मा श्री संजय आऊलवार, तर समाज संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष मा श्री मारोतराव बल्लाळकर, ज्येष्ठ समाज मार्गदर्शक श्री दिगांबर पाटील करेवाड कोल्हारीकर,श्री पि. पि. बंकलवाड साहेब.श्री नरसिंगराव बहीरवाड, श्री जगन्नाथ येईलवाड साहेब, श्री राजन्नाजी आटपलवाड साहेब, श्री नरसिंगराव करेवाड, सेनि प्राचार्य श्री धोंडीबा वारकड सर, श्री रामचंद्र येईलवाड, श्री मल्लेशु पाटील, श्री माधवराव पुपलवाड साहेब, डॉ श्री सायन्नाजी मट्टमवार सर, श्री सतपाल राजम शेठ, श्री अरुण पाटील साहेब , श्री सुर्यकांत आकुलवार, श्री मारोतराव तोटेवाड, डॉ श्री गंगाधर इंद्रवाड, तेलंगणा राज्याचे उद्योजक श्री लालुभाई यादव, डॉ नंदकुमार यादव, सेवानिवृत्त आयुक्त अधिकारी श्री संजय पाटील साहेब, सेवानिवृत्त तहसीलदार श्री काशिनाथ पाटील साहेब,सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी डॉ तुकाराम आऊलवार,सेवानिवृत्त PI श्री श्रीरंग निमनवाड, डॉ भगवान बोंदरवाड, सेवानिवृत्त PI श्री आऊलवार साहेब,माजी उपसभापती श्री आनंदराव गादीलवाड, श्री कपिल करेवाड, तसेच तालुकाध्यक्ष श्री गणेश आनेमवाड उमरी, श्री नवनाथ बदरवाड हदगाव, श्री गंगाधर आऊलवार मुखेड, श्री गंगाधर दोसलवार देगलुर, श्री मधुकर घोसलवाड नायगाव, श्री श्रीहरी बैनवाड मुदखेड, श्री कैलाश चांदोड धर्माबाद, श्री बाबुराव चरकुलवार बिलोली,श्री हरिभाऊ कोंडे लोहा तसेच हिमायतनगर शिवसेना तालुकाप्रमुख श्री संजय काईतवाड, श्री विलास मोमईवार, श्री राजेश उल्लेवार साहेब,

श्री बालाजी मैलागिरे , प्राचार्य श्री बजरंग संगमकर, नवनिर्वाचित नगरसेवक, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सदरील मेळाव्यात वधू-वर परिचय स्मरणिका पुस्तिका विमोचन, समाज भूषण पुरस्काराचे वितरण, यशस्वी उद्योजक व प्रगतीशील शेतकरी पुरस्कार, पदोन्नत कर्मचारी नवनियुक्त अधिकारी/कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी सत्कार, सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची सुवर्णसंधी व महिला भगिनींसाठी हळदी कुंकू कार्यक्रम ई उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कु.श्रावणी श्रीनीवास मलपिलु या मुलीने व नामदेवराव आयलवाड साहेब यांच्या मातोश्री पुष्पाबाई आयलवाड यांनी मनोगतातून समाजाबद्दल अत्यंत प्रेरणादायी चांगले विचार व्यक्त केले,कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त शिक्षक श्री टि. एन. रामनबैनवाड सर तर सूत्रसंचालन कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री रविंद्र बंडेवार सर, सचिव श्री हनमंत काऊलवार सर आणि पदाधिकारी श्री राजेश्वर कारमोड सर* तर आभार श्री गोविंद मक्कापल्ले सर यांनी मानले.

मेळावा मध्ये सेवा निवृत्त अधिकारी सेवानिवृत्त अधिकारी तथा ज्येष्ठ समाज बांधव श्री रमेश बद्दीवार साहेब, व श्री राजेश उल्लेवारसाहेब,माजी सरपंच श्री शिवाजी बोट्टेवाड, श्री मधुबाबू पाकनाटी,श्री रमेश बोडेवाड, श्री सुनील बक्केवार, श्री विठ्ठल बलपलवाड,श्री वट्टमवार देगलुर, श्री माधव दरेगामा, श्री मलन्ना बासावार, श्री वसंत बक्कीवार, ई समाज बांधव उपस्थित होते.

नांदेड शहरात शिख बांधवांचा हिंद दी चादर हा कार्यक्रम असून सुद्धा कार्यक्रम स्थळी आबालवृध्द असे जवळपास अडीच ते तीन हजार समाज कबांधव उपस्थित होते,सदरील मेळावा यशस्वीतेसाठी जिल्हा पदाधिकारी श्री कृष्णराव चिंतलवार साहेब, श्री बि के पाटील कोटेकलुरकर सर, श्री बालाजी नांदेडे सर, श्री सटवाजी नांदेडे, श्री नामदेवराव झंपलवाड,श्री विनोद जानापुरे, श्री अरुणभाऊ करेवाड, श्री बापुराव गोटमवाड साहेब ,श्री बापुराव चिकलपल्ले सर , डॉ अजय पापुलवार, श्री रावण चिकलवाड सर,श्री शशिकांत आकुलवार, श्री गोविंद कोंके, श्री शिवा पाटील, श्री संदीप जिलेवाड,सायलु उल्लेवार, श्री राजेश मट्टमवार सर, श्री हनमंत काऊलवार सर, श्री संतोष बहीरवाड सर , श्री विलास रोकमवार सर, श्री माधव दोसलवार,श्री सहदेव दोसलवारसाहेब, श्री शिवाजी घंटेवाड, श्री अंबादास आटपलवाड सर,,श्री पंडित तोटेवाड सर, श्री राजेश्वर कारमोड सर, श्री अमोल बंड्रेवार,श्री सचिन कोंके, डॉ गंगाधर कोंके, श्री अशोक उडतलवार साहेब, श्री माधवराव बल्फेवाडसाहेब, श्री पांडुरंग पुपलवाड सर,श्री गोपाल बंड्रेवार सर, श्री गणेश नलगोंडे साहेब, श्री गणेश यादव, डॉ बोंदरवाड,श्री परमेश्वर कोल्पेवाड, श्री मधुकर माडगे सर , श्री बालाजी जुरावाड,श्री बाबुराव माडगे सर, ई तसेच श्री सटवाजी करेवाड, श्री सटवाजी मोदलवाड, श्री प्रकाश कारलेवाड,श्री बालाजी पोलवाड, श्री संजय आरलवाड, श्री सदाशिव पालदेवाड,श्री माधव करेवाड, श्री प्रकाश निमलवाड,श्री संतोष मारपवार,पत्रकार श्री माधव काईतवाड, श्री संभाजी आरलवाड, श्री पवन करेवाड, श्री सुनिल मदनवाड, श्री नागेश बरसमवार येरगीकर, श्री माधव गोटमवाड ,श्री धनराज पाटील कोटेकलुरकर, श्री तुकाराम मुंगरे सर, श्री गोपीनाथ बोडेवाड सर,श्री उध्दव मुंगरे सर , पैलवान श्री गोविंद बक्केवाड , कवी श्री श्रीराम घडे,श्री संतोष दासरवार,श्री गोपीकृष्ण पुपलवाड, श्री प्रमोद आटकेलवार, श्री संजय मेंडेवाड, श्री मनोज आऊलवार, श्री श्रीनिवास आटलावार,श्री विठ्ठल (बाबुराव)शिंगणवाड ,श्री सदाशिव शिंगणवाड,श्री काशिनाथ बैनवाड, श्री खंडु मंदवाड, श्री शिवाजी झंपलवाड,श्री बालाजी अनंतवाड डौरकर, श्री शिवाजी परतवाड,श्री चंद्रकांत कटकमोड, , श्री सुरेश गुर्लावार, श्री राजु यमलवाड,श्रीकांत पेनलोड,वैभव उत्तरवाड,श्री गजेंद्र आयलवाड, श्री मोहन घोसले, ,श्री श्रीनिवास बंकलवाड, श्री महेश लखमवाड,नितीन (बाळु)वाडीकर, श्री काशिनाथ बैनवाड, श्री अमोल आटपलवाड प्रविण आटकेलवार,श्री रवि शिरगे, श्री ज्ञानेश्वर शिखरे,राम भाऊ,

महिला आघाडीच्या कार्यकारिणी अध्यक्षा श्रीमती सौ विजयालक्ष्मी अरुण पाटील,श्रीमती लक्ष्मीबाई बोंदरवाड पद्माताई झंपलवाड,सौ सविताताई आयलवाड सौ जनाताई गोटमवाड,सौ देवताताई चिंतलवार,सौ शशीकलाताई पाशमवाड,सौ भागिरथाबाई चिंतलवार, गोदावरीताई जंगिलवाड,सौ ज्योतीताई घुमे ई व तसेच महिला आघाडीच्या सल्लागार तथा पदाधिकारी सौ राधाबाई येईलवाड,सौ कविताताई बंकलवाड, सौ सिंधुताई आकुलवार,सौ गोदावरीताई पाशमवाड, सौ छायाताई पाटील,

सौ छायाताई रामनबैनवाड,सौ निर्गुणाताई आऊलवार,सौ जयश्रीताई रोकमवार,सौ गोदावरीताई बंडेवार,सौ बेबीताई कोंके,सौ संगीताताई जिल्लेवाड,ई महिला भगिनींनी तसेच श्री नामदेवराव आयलवाड साहेब यांचे संपूर्ण कर्मचारी, मित्र मंडळ, पत्रकार बांधव यांनी मोलाचे सहकार्य केले.

सदरील मेळावा 4-5 तास अत्यंत शांत वातावरणात शिस्तबद्ध व दिमाखात यशस्वी पणे सोहळा पार पडला शेवटी सुरुची भोजन करून सर्वांनी समाधान व्यक्त केले आणि मेळावा आयोजकांचे व सर्व पदाधिकारी आणि टीमचे अभिनंदन केले.

# शासकीय मका खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची थट्टा

## मका खरेदी उद्दिष्ट अवघ्या दीड दिवसांत संपले; खरेदी न करताच शेतकऱ्यांना माघारी पाठवले

**दैनिक युवक आधार**

**राजेश/निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी विंचूर येथे सुरू करण्यात आलेले शासकीय मका खरेदी केंद्र अवघ्या दीड दिवसांतच ‘कागदावरच’ उरल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. मका खरेदीचे उद्दिष्ट इतक्या कमी कालावधीत संपल्याने तसेच प्रत्यक्षात पोते उपलब्ध नसल्याने मका न घेताच शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसह माघारी पाठवण्यात आल्यामुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे. हे शासकीय खरेदी केंद्र आहे की शेतकऱ्यांची थट्टा केंद्र? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

निफाड तालुक्यात सध्या पिंपळगाव बसवंत येथे एकमेव शासकीय मका खरेदी केंद्र कार्यरत आहे. मात्र, लासलगाव व परिसरातील शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन विंचूर येथे नव्याने खरेदी केंद्र सुरू करण्यात आले. या केंद्रावर सोयाबीनसाठी ४२५ तर मक्यासाठी ८२५ अशा एकूण १,२५० शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून, सुमारे ४,५०० मेट्रिक टन खरेदीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

प्रत्यक्षात मात्र विंचूर केंद्राला सुरुवातीला केवळ १०० मेट्रिक टन मका खरेदीसाठी अवघी २,००० पोती (५० किलो वजनाची) उपलब्ध करून देण्यात आली. डिसेंबरपासून नोंदणी सुरू असतानाही खरेदी केंद्राचे उद्घाटन तब्बल २७ जानेवारी रोजी सौ. शेफाली भुजबळ यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात करण्यात आले. मात्र, उद्घाटनानंतर अवघ्या दीड दिवसांतच पोत्यांचा साठा संपल्याने मका खरेदी थांबवण्यात आली.

दि. २९ जानेवारी रोजी ‘उद्या मका घेऊन या’ असा अधिकृत मेसेज मिळाल्यानंतर दि. ३० जानेवारी रोजी सकाळपासून अनेक शेतकरी ट्रॅक्टर भरून मका घेऊन केंद्रावर दाखल झाले. मात्र, प्रत्यक्षात बारदान उपलब्ध नसल्याचे कारण सांगत मका न घेताच शेतकऱ्यांना परत पाठवण्यात आले. मेसेजवर विश्वास ठेवून मका काढून, सुकवून, ट्रॅक्टरमध्ये भरून आणलेल्या शेतकऱ्यांची यामुळे मोठी गैरसोय झाली.

ट्रॅक्टर भाडे, मजुरी, इंधन आणि वेळेचा खर्च करून आलेल्या

> “मार्केटिंग फेडरेशनच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आहे. मात्र, वरूनच पुरवठा कमी असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तरीही बारदान व उद्दिष्ट वाढीसाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.”
>
> — विशाल नाईकवाडे, तहसीलदार, निफाड

> “दि. २९ जानेवारी रोजी विंचूर खरेदी केंद्रावर मका घेऊन या असा संदेश आला. ट्रॅक्टर घेऊन गेलो; मात्र, प्रत्यक्षात बारदान शिल्लक नसल्याचे सांगून मला परत पाठवले. नाहक मनस्ताप सहन करावा लागला.”
>
> — बारकू सानप, मका उत्पादक, पाचोरे बु.

शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. त्यामुळे ट्रॅक्टरच्या ये-जा भाड्याचा दुहेरी आर्थिक फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे. संतप्त शेतकऱ्यांनी तहसीलदार तसेच तालुका कृषी अधिकारी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली.

पोर्टलवर नोंद सुरू असल्याने ऑटोमॅटिक पद्धतीने ‘शेड्युल’ मेसेज गेले, असे खरेदी केंद्राकडून सांगण्यात आले. मात्र, पोतेच उपलब्ध नसतील तर शेतकऱ्यांना मेसेज का पाठवले? असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. नियोजनाअभावी शासकीय यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, खरेदी केंद्र सुरू करण्यापूर्वी बारदान, मनुष्यबळ व आवश्यक साहित्याची पूर्तता करावी आणि शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशी ठाम मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.


**शेतकरी आर्थिक अडचणीत**

शासकीय खरेदीत मक्यासाठी २,४०० रुपये तर सोयाबीनसाठी ५,३२८ रुपये प्रतिक्विंटल भाव जाहीर करण्यात आला आहे. या हंगामात २८३ टन सोयाबीन खरेदी झाली आहे. मात्र, शेतकऱ्यांना दोन महिन्यांनंतरही देयके मिळालेली नाहीत. जून महिन्यात खरेदी केलेल्या कांद्याचेही अनेक शेतकऱ्यांना अद्याप पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे शासकीय खरेदी केंद्रावर माल देऊन शेतकरी अधिकच आर्थिक अडचणीत सापडल्याचे चित्र आहे.

# रेवदंडा निवडणुकीत निष्ठा विरुद्ध गद्दारीचा थेट संघर्ष; जनतेच्या हक्कावर दलाली!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : चौल, रेवदंडा, नागाव, वरंडे येथील जिल्हा परिषद मतदारसंघातील निवडणूक यंदा केवळ आकड्यांची किंवा उमेदवारांची लढाई राहिलेली नाही. ही निवडणूक म्हणजे निष्ठा विरुद्ध गद्दारी, स्थानिकांचा हक्क विरुद्ध दलाली, भ्रष्टाचार आणि खरा विकास विरुद्ध खोट्या श्रेयलाटेचा थेट संघर्ष ठरला आहे! महायुती फिसकटल्याने राजकीय समीकरण पूर्णपणे बदलले असून, महाविकास आघाडी, शिवसेना (शिंदे गट) आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात तिरंगी तर काही ठिकाणी चौरंगी लढतींमुळे प्रचाराला जोरदार वेग आला आहे. पण जनतेच्या बोलण्याने राजकारण्यांचे कान चांगलेच तापले आहेत!सुशिक्षित, सुज्ञ आणि तरुण मतदारांमध्ये पक्षांतराच्या गद्दारीची जोरदार खदखद आहे. "रेवदंडात निष्ठावान कार्यकर्त्यांना बाजूला सारून दलालीने उमेदवारी मिळवणारे निवडून आल्यावर स्थानिकांचा हक्क कसा राखणार?" असा प्रश्न उपस्थित होत आहे. चौल येथील स्थानिक म्हणाले, "निवडणुकीत खोट्या श्रेयलाटा घेऊन येतात, पण भ्रष्टाचाराने भरलेल्या कामांमुळे ठेकेदार श्रीमंत होतात आणि आम्हाला फक्त आश्वासनं मिळतात!" रेवदंडा भागात एका तरुणाने सांगितले, "ही गद्दारीची राजकीय संस्कृती थांबवायला हवी. खरा विकास हवा, दलाली नाही!"नागाव आणि वरंडे येथेही असाच संताप



आहे. "जिल्हा परिषदेची कामं ठेकेदारांना देऊन कमिशन भरपूर घेण्यापलीकडे काहीच नाही. स्थानिकांच्या हक्कावर डाका रोखला पाहिजे," असे मतदार सांगत आहेत. काही उमेदवारांनी स्वतःच्या नेत्यांना फसवून दुसऱ्या पक्षात घुसखोरी करून उमेदवारी पदरात पाडली असल्याचे आरोप आहेत.

जनतेचा नारा स्पष्ट आहे – "निष्ठा आणि विकासाला मते, गद्दारी आणि भ्रष्टाचाराला नाही!" प्रचार सभांमध्ये हे प्रश्न विचारले जात असल्याने उमेदवारांवर दबाव वाढला आहे. अलिबाग तालुक्यातील ही निवडणूक आता जनतेच्या विश्वासाची खरी कसोटी ठरणार आहे. स्थानिक हक्क आणि खऱ्या विकासासाठी मतदार जागे झाले आहेत. उमेदवारांना आता गद्दारीच्या आरोपांचे उत्तर द्यावे लागेल!

# गुणनियत्रंण समिती गठीत करून दोषीवर योग्य ती कार्यवाही केली जाईल – विभागीय अभियंत्यांचे लेखी आश्वासन


## लेखी आश्वासनानंतर उपोषणकर्त्यांचे आमरण उपोषण मागे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनीधी / काईतवाड बोरगडीकर/ हिमायतनगर :** तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालय अंतर्गत होणाऱ्या अनेक कामांमध्ये अनियमितता व निकृष्ट बांधकाम चालू असल्याबाबत व त्या कामाबाबत माहिती मागितली होती.ही तक्रार करूनही गेल्या एक ते दीड महिन्यापासून कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अखेर तक्रारकर्ते यांनी सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय भोकर या कार्यालयासमोर दिनांक २७ जानेवारी २०२६ पासून तक्रारकर्ते विजय नारायण वाठोरे, दाऊ गाडगेवाड,माधव काईतवाड व गंगाधर गायकवाड यांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसत संबंधित प्रशासनास धारेवर धरले होते.उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी अर्थात दिनांक २९ जानेवारी रोजी उपोषणकर्त्यांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या व या उपोषणास यश आले आहे.

या उपोषणातील उपोषणकर्त्यांच्या मागण्या पुढील प्रमाणे होत्या, हिमायतनगर तालुक्यातील जिल्हा सीमा वारंगटाकळी ,धानोरा,बोरगडी,हिमायतनगर,टेंभी,अंदेगाव,वाळकेवाडी,दुधड या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरण रस्त्याचे गुण नियंत्रण विभागामार्फत समिती गठीत करून तक्रारकर्त्यांसमोर तपासणी करण्यात यावी. अंदाजपत्रक व वर्क ऑर्डर तसेच रस्त्याचा लेखा परीक्षण अहवाल देण्यात यावा तसेच सदरील ठेकेदाराचे देखील तात्काळ थांबविण्यात यावे. सदरील कामाचे देखरेख करणाऱ्या संबंधित दोषी असणाऱ्यांना अभियंत्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे.या मागण्यांमधील प्रमुख असलेली प्रथम मागणी व इतर दोन मागण्या मान्य करण्यात आले आहेत. तसेच शेवटची जी मागणी आहे ती गुण नियंत्रक पथकामार्फत चौकशी केल्यानंतर दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाहीचा बडगा उचलला जाईल असे लेखी पत्र हिमायतनगर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालयाचे उपविभागीय अभियंता साईश्रवण दुबे यांनी उपोषणकर्त्यांना देऊन उपोषणाचा शेवट केला.

उपविभागीय अभियंता यांनी दिलेल्या पत्रामध्ये नमूद केले आहे की संबंधित रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी सक्षम समिती दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत गठीत करण्यात येईल. या समितीमार्फत



कामात दोष आढळल्यास दोषी असलेल्या गुत्तेदार तथा अभियंत्यांवर योग्य ती कार्यवाही केली जाईल असे लेखी आश्वासन उपविभागीय अभियंता यांनी उपोषणकर्त्यांना दिले आहे. या उपोषणासाठी उपोषणकर्त्यांना संरक्षणासाठी भोकर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली डी.एस बी. चे परमेश्वर गाडेकर सर,पोलीस अंमलदार माळकोटे,विठ्ठल ढोले,संतोष चव्हाण,चुकेवाड यांनी संरक्षणासाठी सहकार्य केले.या उपोषण स्थळी बालाजी पोलवाड, भोकर शिवसेना तालुका प्रमुख माधव वडगावकर,माधव करेवाड,बालाजी डुबूकवाड, उबाठा गटाचे हिमायतनगर तालुकाप्रमुख संजय काईतवाड, बोरगडीचे सरपंच प्रतिनिधी सुधाकर काईतवाड,जवळगावचे सरपंच गनपत नाचारे, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते आशिष सोनवणे,नगरसेवक प्रतिनिधी रमेश पंडित, लोकस्वराज्य आंदोलनचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष धोंडोपंत बनसोडे, दैनिक तरुण भारत चे मनोज पाटील, कैलास कांबळे,दैनिक गाववाला चे विष्णू जाधव यांनी उपोषण स्थळी भेट दिली. तसेच भ्रमणध्वनी द्वारे दलित पँथर च्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रियांका बागुल, माहिती अधिकार-पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर, मराठवाडा अध्यक्ष राजू शिंदे, भोई महासंघाचे जिल्हाउपाध्यक्ष विजय उट्टलवाड यांनी संबंधित प्रशासनाला धारेवर धरत उपोषण कर्त्यांना पाठिंबा दिला.यामुळे उपोषणकर्त्यांनी केलेल्या तीन दिवसाच्या आमरण उपोषनाला यश आले आहे.

उपोषणकर्त्यांनी सुरू केलेल्या या उपोषणामुळे उपविभागीय अभियंता व विभागीय अभियंता यांचे धाबे दणाणले होते. जिल्हा अधीक्षक अभियंता धोत्रे यांनीही याबाबत विभागीय कार्यकारी अभियंता चोपडे यांना याबाबत विचारणा करून योग्य ती कार्यवाही करण्यास भाग पाडले. यामुळे विभागीय कार्यकारी अभियंता चोपडे यांनी तात्काळ उपविभागीय अभियंता दुबे यांना आदेश देऊन उपोषणकर्त्यांना उपोषणापासून परावृत्त करण्यासाठी कशोसीने प्रयत्न केलेले दिसून आले.

या उपोषणाच्या यशामुळे हिमायतनगर तालुक्यातील संबंधित रस्त्यामुळे त्रस्त असलेल्या नागरिकांनी उपोषणकर्त्यांचे कौतुक करत त्यांचे धन्यवाद मानले आहेत.